
# शिव-स्वप्न

प्रफुल्ल दत्त

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५६८




REFBK-0011773
REFBK-0011773

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६८४ वि: काव्य
क्रमांक १५५८ नों: दि: ३०.११.६३

आनंद-बनाच्या दरी-खोऱ्यांतून
अनवाणी वाटचाल करणाऱ्या
यात्रिकाची स्मरणी

# शिव-स्वप्न

११८५३

प्रफुल्ल--दत्त

संध्या प्रकाशन मुं. २८

REFBK-0011773
REFBK-0011773

किंमत तीन रुपये

प्रकाशक : पी. एल्. ( तथा मामा ) सावंत
संध्या प्रकाशन
१५ गोपाळ भुवन, खेडगल्ली
दादर मुं. २८

♣

प्रथमावृत्ति : १७ डिसेंबर १९६१

♣

चित्रकार : परब

♣

मुद्रक : ब. ना. जोग
विवेक मुद्रणालय
प्रभादेवी, मुं. २८.



र
स
ज्ञ
तूं

छत्रपतींच्या मनोगतांतिल आशय तूं हेरिला
संघर्षास्तव उभा राहिला महाराष्ट्र प्रेरिला
सहिष्णुतेनें तुझ्या प्रतिपदीं किनारिलें संयमा
मनोधर्म हा तुझा अच्युता, 'वैऱ्यालाही क्षमा'
पिंजित सह्याद्रीचे वारे वज्रापरि तूं खडा
धैर्याचा आसेतुहिमाचल झडे तुझा चौघडा
'शिव-स्वप्नां'च्या कलशांतिल जल सिंचित जातां पथीं
म्हणेल भारत एकादिलाने, 'हा अमुचा सारथी'
हरीपरी सारथ्य तुझें घडवील महाभारत
ही अनवाणी प्रतिभा माझी तुझिया चरणीं रत
मी न कुणाचा भाट, तुण्तुण्यावरी न माझें जिणें
घनता भारावते तिथें ही रसवंती मम शिणे
सार्थ नाम यशवंत म्हणुनि ही स्मरणी अर्पी तुला
रसज्ञ तूं, जाणसी कळेची कशी करावी तुला

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34६०8 दि: 9/0४

# शिव–स्वप्नांची स्मरणी


| | | |
|---|---|---|
| | मी यात्रिक आनंद वनींचा | ९ |
| १ | सह्यतलीं या | ११ |
| २ | माई ! आवस वाढा | १३ |
| ३ | एकतारी | १५ |
| ४ | ध्यास जिवाला जडे | १७ |
| ५ | भिजलीं बिल्व–दलें | १९ |
| ६ | महाभारताची नांदी | २१ |
| ७ | झोका | २४ |
| ८ | तुळस | २६ |
| ९ | श्री–ग–णे–शा | २७ |
| १० | येते वन्दनाला | २९ |
| ११ | पाठ हा पहिला रामायणीं | ३० |
| १२ | असाच भाला फेक | ३२ |
| १३ | येथें स्वातंत्र्य जगें | ३४ |
| १४ | रंगलीं मावळचीं खोरीं | ३६ |
| १५ | तरला गाथा | ३८ |
| १६ | मी सारथी या शिवाचा | ३९ |
| १७ | सुख कौसल्येचें | ४१ |
| १८ | आली टोळधाड | ४३ |
| १९ | किनारते विजिगीषा | ४५ |
| २० | शौर्य उफाचें | ४७ |
| २१ | तोरण दिग्विजयाचें | ४८ |
| २२ | भ्रमण | ५० |
| २३ | तांडव हें रुद्राचें | ५३ |
| २४ | याच शमीच्या वृक्षाखालीं | ५४ |
| २५ | चरण राघवाचे | ५६ |
| २६ | तीं पदीचीं जोडवीं | ५७ |
| २७ | सुरत न ही, लंका | ५९ |
| २८ | अचल तरी मी | ६० |
| २९ | व्यापिली खानाने जावळी | ६२ |
| ३० | प्रसंगीं रोधु सहस्राक्ष | ६४ |
| ३१ | क्रांति–पुष्प | ६५ |
| ३२ | केवळ खड्गाशीं नातें | ६७ |
| ३३ | कधीं न घडलें, घडें | ६९ |
| ३४ | देह पडो प्रभुचरणीं | ७१ |
| ३५ | बैरागी हा नव्हे, शुभंकर | ७३ |
| ३६ | तटाला भिडली यशवंती | ७५ |
| ३७ | वाकला सह्य जरि | ७६ |
| ३८ | रायगडा ! | ७८ |
| ३९ | सुवर्ण झालें खरें | ८० |

४० ढळले चिरे ८२
४१ नराचा होतो नारायण ८४
४२ असा येथ भारावलो ८६
४३ इथें प्रेरणा ८८
४४ पदराखालिल दिवा ९२
४५ भक्तिचें दान ज्ञानेश्वराला ९४
४६ तख्त हवें भूपाला ९६
४७ भाऊ म्हणुनी राहूं ९८
४८ कलल्या संध्या–छाया ९९
४९ जयजयकार १०१
५० उधाण आलें अंधाराला १०३
५१ असावें एक छत्र भारतीं १०५
५२ आई १०८
५३ श्वाना ! शिवाकार तूं १११
५४ भजन अतां काळाचें ११२
५५ भेटे सह्य हिमाला ११४



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 34568 वि: 

क्रमांक ... नों: दि: 30.11.67

# शिवाजी : काळाचा एक अमोल नजराणा

महाराष्ट्र ह्या ' शिव–स्वप्नां'वर जगणारा एक कणखर देश आहे. या कणखरतेची परंपरा निवृत्ति ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत यांच्याइतकी जुनी आहे. पिढ्यानुपिढ्या आक्रमकांच्या करड्या नजरेखालीं जगणारें मराठी मन शिवकाळापर्यंत मरगळलेलें होतें. संतांच्या भक्ति–मार्गाच्या परिसरांत उजळली जाणारी मूठभर माणसें सोडलीं तर सर्वत्र अंधःकार होता. उगवला दिवस तो आपुला, या अल्पसंतुष्ट वृत्तीनें दरीदरींतील खेड्यांतील झोपडी कशी बशी उभी होती. शिलेदार म्हणून मिशीला पीळ देऊन प्रौढी मिरविण्याइतके शौर्य अंगीं असून देखील तें दाखविण्याची संधि मिळत नव्हती. कमरेला कोयती–विळा धारण करणारा कर्मयोगी शेतकरी आणि कपाळी गंधाचा टिळा लावणारा भक्तिमार्गी शैव यांच्यातला ' प्रलयंकर ' जागविणारा...शिवशक्तीचें नेतृत्व करणारा कुणीतरी बाजी महाराष्ट्राला हवा होता तो शिवाजीच्या रूपानें प्रगट झाला.

पित्याचें शौर्य, मातेचें शील आणि गुरूची शिस्त असें तिहेरी ऋण लाभलेलें शिव–चरित्र बाळपणापासूनच परिसराला अद्भुत वाटूं लागलें. मातेच्या अंकीं ऐकलेल्या रामायण–महाभारतांतील समर–प्रसंगांनीं बाल–शिवबाला स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. दादोजी कोंडदेवांनीं त्याच्यांत दुर्दम्य आशावाद निर्माण केला. आणि रामदासांनीं...त्यांच्या गुरुदेवांनीं...आपल्या शिष्यांतील 'पुरुषोत्तम' ओळखिला. स्वातंत्र्य–युद्धासाठीं दंडकारण्याच्या दरी-खोऱ्यांतून अनवाणी हिंडून शेंकडो शिलेदार उभा केला.

समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें शिवाजीच्या अंगीं उत्तम पुरुषाला आवश्यक असे अनेक गुण होते. कारुण्यानीं किनारलेल्या त्यांच्या जीवनांतील कांहीं समर प्रसंगांनीं मरगळलेला माणूसहि ताठ व्हावा इतकी त्यांत चित्–शक्ति आहे.

दा. क्र. ११५६३

आजच्या विद्यार्थ्याला शिव–चरित्र अवघ्या चार-दोन पानांत शिकावें लागतें. आणि आमच्यासारख्यांना –ज्यांनी ह्या चिमण्या चंडोलांच्या आणि गरुडांच्या पंखांत ऊब भरायची त्यांना– तें शिकवावें लागतें. दासबोधाच्या शिकवणुकींतून तयार झालेल्या मागल्या पिढींतील शिक्षकाला शिवाजीच्या मर्दुमकीच्या चार गोष्टी सांगायच्या म्हटल्या तरी सांगायला अवसर नाही. संध्येच्या मावळत्या किरणांतून ज्यांनी क्रांतीचा रंग उधळला त्या छत्रपतींच्या चरित्राची उजळणी उगवत्या पिढीला घटकाभरांत करण्याची पाळी यावी, यासारखें दुर्दैव नाहीं.

महाराष्ट्र हा पूर्व दिव्य असलेल्यांचा देश आहे. त्याच्या पाऊलवाटा परकीय आक्रमकांनीं कित्येक शतकें अंगारलेल्या होत्या.

## 'अटी-तटीला खड्ग कटीला'

असेंच जीवन त्याला जगावें लागलें. भवानीच्या भक्तींत भिजलेला भगवा झेंडा शिवाजीच्या मराठ्यांनीं काल आणि आजहि अटकेपार नेला आहे. आज हिमालयानें सह्याद्रीला सहाय्यासाठीं हाक मारली आहे. लुटीची भाषा करणाऱ्या शत्रूला महाराष्ट्राची मूठ खड्गावर पडली हें कळतांच बेजबाबदारपणें पहाडावर चढलेलें बुटाचे खिळे खिळखिळे झाले, एवढी जरब "मराठा" ह्या शब्दांत आहे.

ह्या मराठ्याचा राणा...काळाचा एक अमोल नजराणा, राजा छत्रपति शिवाजी ह्यांच्या चरित्रांतील ही स्मरणी मी आज महाराष्ट्राच्या हातीं देत आहे. ह्या स्मरणींतील प्रत्येक मण्याच्या घाटांत नवा अक्षर–बंध आहे, काळाच्या निळ्या रुमालावर शिंपडलेल्या शिव–किर्तीच्या अत्तराचा गंध आहे. ह्यांतील एक सोडून सारीं कवनें गेय आहेत. तीं प्रेय ठरलीं तर त्या श्रेयाचा वाटा भारतीय वीरांचीं चरित्रें तन्मयतने ग्रहण करणाऱ्या रसिक–वृंदाकडे जाईल. मी केवळ नश्वर शब्दांना फुंकरून त्यांच्यांतील ईश्वरत्व फुलविणारा अनेकांपैकीं एक छांदिष्ट.

शिव–स्वप्नांची ही स्मरणी गुंफतांना मला श्री. पुरंदरे यांच्या छत्रपति शिवाजीच्या चरित्राच्या १ ते १० सचित्र भागांचा विशेष उपयोग झाला. विषय रंगवून सांगण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. दहा ते सोळा वर्षांच्या मुलांच्या हातांत हे भाग पडलें तर त्यांच्या संस्कारक्षम मनांत खात्रीनें क्रांति होईल.

१४–१–६३ मुंबई

**प्रफुल्ल–दत्त**

अनुक्रम ३५६९४ वि: काव्य
क्रमांक ......... नों: दि: ३०।११

# मी यात्रिक आनंदबनींचा

समर्थांनी महाराष्ट्राला आनंदवन म्हटलें आहे. ह्या आनंदवनाच्या दऱ्याखोऱ्यांतून संचार करणाऱ्या यात्रिकाच्या कंठांतील स्मरणी म्हणजेच हीं शिव-स्वप्नें. शिवकालीन महाराष्ट्राचें त्याला जसजसें भाव-दर्शन घडलें तसतशी त्याची रसवंती स्वर-बद्ध होत गेली.

मराठी ग्रंथ संग्रहालय दा. क्र. संग्रह शाखा

मी यात्रिक आनंदबनींचा भाव मुखीं मुक्तीचा
शिव-स्वप्नांची स्मरणी कंठीं नजराणा भक्तीचा
सह्यगिरीच्या दरीदरींतुनि फिरतों मी अनवाणी
ढळल्या ढासळल्या बुरुजांची चिऱ्याचिऱ्यांत कहाणी
मुक्तीस्तव थयथयले इथले शिलेदार शिवकालीं
सम्राटाच्या वज्र-प्रहारें दुभंगल्या नच ढाली

'मी–तूं'च्या नात्यांत न विरली ज्वलंत इथली माती
वदली राया, "पिंजितील हीं वादळास तृणपातीं"
इथलीं खेडीं, झालीं वेडीं, जीवन–यज्ञासाठीं
प्रक्षालाया परवशतेचा काळ-कलंक ललाटीं
त्या यज्ञाचा आशय व्हावा शब्दरूप रस-सिद्ध
म्हणून हें प्रस्फुरतें मानस निमिष-पळा हो विद्ध

अक्षरांत गुंफिला भाव तरि अक्षय केंवि म्हणूं मी ?
ठरे उद्यांची उल्का, तारा आज तळपती व्योमीं

छंद मला परि गुंफायाचा आशय उन्मेषाचा
छंदाच्या कैफांत विसरतो जीवन-अंश विषाचा

शिव-जीवन-रेषावलयांतुनि नृत्य करी प्रतिभा ही
रसिक उद्यां देतील तिच्या रस-सौंदर्याची ग्वाही
कुणी बोलतां 'बरें'मुखीं उमलेल स्मिताची रेषा
आणि पुन्हां रंगवीन चरणीं अंतरिंच्या उन्मेषा
मी यात्रिक आनंदवनींचा माझेंपण मातींत,
स्फुरतिल मनिंच्या मांगल्याचीं हीं शिव-स्वप्नें जींत

१ :

# सह्यतलीं ह्या

सह्याद्रीच्या कड्यांवरील बुरुजाबुरुजावर शत्रूंचीं निशाणें पाहून जिजाबाईचें अंतःकरण अनेकदां अंगारून येई. अशा एका घटकेचें चित्रण पुढील चरणांत केलें आहे.

ध्वज भंवती गनिमांचे
सह्यतलीं ह्या असह्य होई हें वर्चस्व तमाचें

राबुनि निरलस वर्षाकाठीं
जमविति जन जें अपुल्या गाठीं
रोवुनि भाले त्यांच्या पाठीं
लुटिती श्रेय श्रमाचें

जेत्यांचें कुणिही करि दंगे
लुंगेसुंगे आणि लफंगे
जीवन कसलें त्यांच्यासंगें
मरण जणूं जुलुमाचें

श्रमणाराला घांस न येथें
जेते सर्वस्वाचे नेते
इथली बागाइत अन् शेतें
धन त्यांच्या धर्माचें

कधिं या पद—दलितांच बाहू
मुक्तीस्तव होतील लढाऊ ?
गर्जत, "बंध न आतां साहूं
सरले दिवस भ्रमाचे."

दरीदरींतिल शिलेदार शत
प्रतिकारास्तव होता जागृत
पशुता जहरी घेइल दहशत
नमतिल शब्द दमाचे

निरंत हे तर दृष्टिपथीं ध्वज
अंगारापरि जाळिति काळिज
विध्वंसाया प्रस्फुरती भुज
करडेपण हुकुमांचें

: २ :

# माई ! आवस वाढा

शिवनेरीच्या पायथ्यालगतच्या खेड्यांतून आवस मागायला निघालेली एक महारीण जिजाईच्या दारीं येते. यवनांच्या भुरट्या सैन्याच्या संहाराला बळी पडलेल्या त्या दलितेच्या मनोभावनांचा हा आविष्कार. ह्यांत ' अवसेचा अंधार दूर करणारा तेजस्वी पुत्र तुझ्या पोटीं जन्माला येवो ' अशी मनीषा व्यक्त केलेली आहे.

माई ! आवस वाढा
महारिणीचें ऋण महिन्याचें फेडा
सुकृत जोडा

अन्नाविण सरतो दिन
विश्रांतीवांचुनि शिण
जीवन हें मायेविण
निष्फळ रामरगाडा
—आवस वाढा

गनिमांचें भुरटें दल
दलितांचा करितें छळ
त्रात्याविण कुठलें बळ ?
इथें न न्यायनिवाडा
—आवस वाढा

लष्करांत धनि श्रमती
तरिहि पडे धन कमती
हात भुकेला नमती
भिवाविति अक्रुर-दाढा
—आवस वाढा

भाव तुझा मायेचा
वर्षेच्या छायेचा
"स्नेह सरो ' जा-ये'चा"
कधिंहि न वदला वाडा
—आवस वाढा

हाच असा उंबरठा
जेथ गळे पदिं ताठा
घेइ भरुनि उत्कंठा
तृप्तीचा येथ घडा
—आवस वाढा

पिण्ड तुझ्या उदरींचा
संहारिल मद अरिचा
लाख शिपाई दरिचा
जागवील सह्यकडा
—आवस वाढा

जाण माउली हें वच
नियतीचें क्रांति-कवच
आवस मागाया नच
आले हा चढुनि कडा
—आवस वाढा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३५६५४ वि: काव्य
क्रमांक ........ नों: दि: २०.९१

: ३ :

# एकतारी

गनिमांच्या अमानुष अत्याचाराला बळी पडलेल्या एका वृद्धाच्या उध्वस्त जीवनाचे हे सूर. मुक्तीचा सोहळा पाहूं इच्छिणाऱ्या त्याच्या व्यथेंत मराठी मातीच्या मनांतील शतकाशतकांचा कढ आहे

जीवन–अंधारीं
साथी एकतारी
जागत्या स्वप्नांचीं
उसवीत पिसें
माझें वेडें मन
आकाशाला हंसे
नाही कुणासाठीं
आसावत जीव
सारे आवरून
ओलांडिली शीव
कुशींतल्या कळा
पालवितो गळा
अनंताचा लळा
उध्वस्त संसारीं
साथी एकतारी

आहे एक माझी
कुडाची झोपडी
सखिसंगें जिथें
रंगली ही कुडी
काळोखाच्या वाटे
आलें कुणी दारीं
आली हाक कानीं
हृदय–विदारी
सखीविण आतां
रंगवितों व्यथा
निस्संगाचा गाथा
इंद्रायणी तारी
साथी एकतारी

अमुरांच्या छळे
गांजले मावळ
कुठवरी तरी
सोसावा हा छळ !
माई ! तुझी कूस
भरल्या दिसाची
सांगते भरली
घटका कंसाची
  तुझ्या लोचनांत
  खेळे भगवंत
  अवसेचा अंत
उद्यांच्या उदरीं
  साथी एकतारी

कळेल जगाला
कढ या मातीचा
माझा मायदेश
कोणत्या जातीचा
दिगंताच्या पार
पिटाळील वैरी
आणि आलिंगील
जन्माचा कैवारी
  पाहूं दे या डोळा
  मुक्तीचा सोहळा
  लटकल्या माळा
ध्वजा दारोदारीं
  साथी एकतारी

: ४ :

# ध्यास जिवाला जडे

गर्भवतीचीं पहाट-स्वप्नें खरीं ठरतात म्हणे ! शिवजन्मापूर्वी कांही दिवस जिजाबाईला पुढील भावार्थयुक्त स्वप्नें पडत असावींत.

स्वप्न पहाटे पडे, अलिकडे ध्यास जिवाला जडे
कूस पुऱ्या दिवसाची माझी, काळिज हें धडधडे

इथें गडावरि एकटीच मी
दूर कुठें स्वारीवरि स्वामी
कधिं शंकेची अंतर्यामीं
पाकोळी फडफडे—

असुनी सेवा उभी उशाशीं
धाया मनिचें हाकेसरशी
जीव धन्याच्या चरणापाशीं
घार होउनी उडे—

शीतल गंधित नीरव परिसर
आत्म-चिंतना येथें अवसर
छत्र निळें धरि शिरिं गंगाधर
मानस-दर्शन घडे—

कौसल्या मी, राम उदरिं मम
येइल, विध्वंसील नराधम
निवारण्या परवशतेचा तम
पिळवटतें आंतडें—

गर्भवती मी, 'मी'पण नुरलें
उदरींच्या पिंडांतुनि उरलें
भविष्याचिया स्मरणीं सरलें
कटी-कुशीचे घडे—

चैत्र सरे, वैशाख उजाडे
निरंत जागे मन हें वेडें
उभवी कैलासावरि वाडे
काय दैव-करिं-दडे—

तूंच शिवांगी, आतां त्राती
कलश पूर्तिचा दे मम हातीं
पडोत इथल्या मातीवरती
शांति-सुखाचे सडे—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 34648 वि: ०१०८८
क्रमांक ........................ नों: दि: 30191

: ५ :

# भिजलीं बिल्व-दलें

शिवनेरीच्या नितांत रम्य परिसरांत जिजाबाई शिवपूजेंत मग्न असतांना पारतंत्र्याच्या जाणिवेने कढलेल्या अश्रूंनी तिच्या अंजलींतील बेलाचीं पानें ओली होतात.

**जिजाई** : आज पूजितां शिव-प्रतिमा ही स्वप्न-भाव उमले
आसवांत मम अंजलींतली भिजलीं बिल्व-दलें
विजनवासिनी हें देवालय
कधिंहि इथें मन होतें तन्मय
संध्या करि परिसर कांचनमय
जाणवते तरि महाराष्ट्र मम परवशतेमधिं जळे
भिजलीं बिल्व-दलें
इथें फडकती ध्वज यवनाचे
नजराणे गंधित पवनाचे
हें तर माझ्या शल्य मनाचें
भस्मसात होतील कधीं ते क्रांतीच्या वादळें
भिजलीं बिल्व-दलें

( ह्या ठिकाणीं घंटानाद होतो. जिजाई भीतियुक्त नजरेनें तिकडे पाहते )

घंटानाद कसा एकाकी
भिडला गिरिच्या तुंग तटाकीं
त्यांत रात्र अशि ही काळोखी

**भक्त :** अभय असावें माई, तुमच्यापरी मीहि तळमळे
भिजलीं बिल्व-दलें

**जिजाई :** सांग तरी मज कोण कुठिल तूं ?
इथें अवेळीं कसला हेतू ?

**भक्त :** मी न हेर कुणि, मनीं न किन्तू
आळवितो शिव-स्वप्नांतुनि हळुवार भाव आंतले
भिजलीं बिल्व-दलें

**जिजाई :** जाणिवेंत तनु जळतां कणकण
चित्त-शक्तीला मिळतें इन्धन
गळतें स्वामित्वाचें बन्धन
अनंतास आवाहन करितां प्रेय हवें तें मिळे
भिजलीं बिल्व-दलें

**भक्त :** पूजेची ह्या तुझी सांगता
करिल महाराष्ट्राची माता
पुत्र तुझा तारील अनाथा
गर्भवती तेजोमग्ना, तुज अभिवादन कर-तलें
देती मज दृष्टांत हाच, हीं भिजलीं बिल्व-दलें

गाठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५२५८ वि: ०८०५
क्रमांक ............ नों: दि: ३०।१२।६५

: ६ :

# महाभारताची नांदी

शिवाजीच्या बारशाचा हा प्रसंग. बारा घरच्या बाराजणी जमलेल्या आहेत. दिवस धारेवर उतरला आहे. शिवाजीचें बारसें ही स्वातंत्र्याच्या महाभारताची नांदी आहे, ही मध्यवर्ती कल्पना.

**कुणी एक स्त्री** : आल्या बाई साऱ्याजणी
आणि आतां सांजावलं
नको व्हावया अवेळ
घाला पाळण्यांत बाळ

**दुसरी** : लावा माईच्या कपाळीं
कुंकू, आणि ओटी भरा
कुणी हलक्या हातानें
बाळ पाळण्याशीं धरा

**तिसरी** : नांव योजिलें मनाशीं
माई, कोणतें सांगावें

**जिजाई** : नांव असावें असें कीं
कंठी काळाच्या रंगावें
शिव दैवत जिवाचें
नांव म्हणून शिवाजी
ज्यांच्या संगें फुलतील
भविष्याचीं स्वप्नें माझीं

कुणा ब्राह्मण बोलवा
त्याच्या आशीर्वादाविना
प्रेयाभोंवतींची कधीं
पुरी न हो प्रदक्षिणा

वृंदावनापाशीं रेखा
आज नव्यानें स्वस्तिक
मांगल्याच्या अभिषेकें
होई कुणीही आस्तिक

गोठ्यांतल्या नंदिनीला
नका विस्मरूं पूजाया
हवी शिवावरी तिच्या
कृपा-प्रसादाची छाया

आली नाही महारीण
तिची साडी-चोळी ठेवा
ओटीपोटचिं हें भाग्य
तिच्या नवसाचा ठेवा

सांगा जा त्या बैराग्याला
साथी ज्याची एकतारी
दिगंताला तारणारें
परब्रह्म आलें दारीं

वाटा भरल्या मुठीनें
आल्या-गेल्याला साखरा
अंजलीचें दान काय
करी रंक गंगाधरा ?

तुम्हां साऱ्यांच्या शुभाशा
रंगल्या ह्या ब्रह्मानंदीं
वाटे बारसें, उद्यांच्या
महाभारताची नांदी

: ७ :

# झोका

बाल शिवाजीच्या पाळण्याला झोका देतांना जिजाईच्या मनांत कांहीसे असेच विचार आले असतील.

देतां तुज झोका
मनिषा मम शिव, भूषण व्हावें इहलोका

पक्षिराज गरुडाची झेप अडे
तुंग असे, दृष्टिपथीं सह्यकडे
ज्यांच्यासह आकांक्षा गगनिं चढे
अरुण-तेज जेथें ये पिंजित काळोखा
देतां तुज झोका

भिंतीवरि खड्ग-ढाल-वाघनखें
जातिवंत शूराचीं स्पर्श-सुखें
तेथ आजपासुनि तव नजर झुके
झांकल्या मुठींत भाव 'असुरांना रोखा'
देतां तुज झोका

वाहन तुज थयथयत्या अश्वाचें
दर्शन ज्यांच्या खुरांत विश्वाचें
तेविं धडे तेथिल तव शौर्याचे
मारितील आणि तारितील उद्यां लोका
देतां तुज झोका

गनिमांचे सेवक तव तात जरी
मातृ-भाव जागव हा परि उदरीं
ह्या दुभंगल्या धरेस मुक्त करी
आवर तूं दलितांच्या शतकांच्या शोका
देतां तुज झोका

म्हणतां कुणि "शिव माझा मातृ-मुखी"
संकोचुनि होई मम वृत्ति मुकी
"मातृ-मुखी पुत्र करिल देश सुखी"
सांगती भविष्य तुझ्या मुख-मंडल-रेखा
देतां तुज झोका

'परवश मी' हीच जिवा जाळि व्यथा
हृत्पटलीं रंगवितें रामकथा
देइ शिवाई बळ मम दाशरथा
वांछित तें देशिल तूं, तिळहि न आशंका
देतां तुज झोका

: ८ :

# तुलसी - वृंदावन

तुळस हें मराठी स्त्रीचें दैवत. ह्या दैवताभोंवतीं फेर घरतांना तिच्या मनाला कंठ फुटतो. भविष्यांतील स्वप्नें पापण्यांच्या मागें येऊन उभीं राहातात.

तुलसी-वृंदावन
ह्या सौभाग्याभंवतीं माझें फेर धरी तन-मन

इथें संयमित मन आर्येचें
जिचें आमरण व्रत सेवेचें
स्फुरतें गातें जीवन-वेंचे
ताल धरी कंकण
तुलसी - वृंदावन

शस्त्र जिथें नमतें पोटास्तव
शब्दगौरवा लवे अवास्तव
केविं तिथें उरिं उमलावें शिव
उजळाया प्राक्तन
तुलसी-वृंदावन

संसाराच्या स्वप्न-सुखामधिं
इथें रंगतां तिची समाधि
घरकुलांतल्या विरती व्याधि
घडतें शिव-दर्शन
तुलसी - वृंदावन

शपथ आज ही तुला दिलाची
शिव-पूजेंतील बिल्व-दलाची
शक्ति संहरो सह्य-तलाची
मत्तांचें मीपण
तुलसी - वृंदावन

मुलुख-गिरीवर पति परदेशीं
रक्षाया जेत्यांच्या वेशी
खंत मना ही, "मी न स्व-देशीं"
परवशता बन्धन
तुलसी - वृंदावन

एकच आणिक स्वप्न उरींचें
हें शिव माझ्या आज करींचें
ठरो उद्यांच्या काळ-शिरींचें
महाराष्ट्र-भूषण
तुलसी-वृंदावन

: ९ :

# श्री-ग-णे-शा

दसऱ्याच्या मुहूर्तावर शिवबाळाला मांडीवर घेऊन जिजाई त्याला 'श्रीगणेशा'चा धडा गिरवावयास शिकवीत आहे. ध्यानीं-मनीं-स्वप्नीं स्वातंत्र्याचें स्वप्न फुलवूं पहाणाऱ्या जिजाईच्या मनोभावनांचें दृश्य कवितेंत चितारलें आहे.

सीमोल्लंघन आज, मनोमन
चल ये पूजूं श्री-ग-णे-शा
तो सुखकारी संकटहारी
दर्शन मंगल त्याचें तारी
तोच चितारी तळव्यावरती ज्ञानाची रेषा
श्री-ग-णे-शा

ठेव अशी मांडीवरि पाटी
गिरवि अक्षरें उजव्या हातीं
श्रमांवांचुनी 'श्री' न,असो मग कुठलाही पेशा
श्री-ग-णे-शा

श्रीचरणीं नमल्या–श्रमल्याविण
पुरुषार्थांतिल तरे न मीपण
वाकविते श्री उन्मत्तांच्या जीवन-उन्मेषा
श्री-ग-णे-शा

ह्या पाठाचें वळण कळे ज्या
उलथिल तो कलिच्या साम्राज्या
दृष्टि-पथांतिल अन्यायाच्या ध्वंसिल अवशेषा
श्री-ग-णे-शा

सह्य उभा हा तुझ्या पाठिशीं
पुण्य पित्याचें आणि गाठिशीं
मातेची प्रेरणा त्यांत, 'करि मुक्त मायदेशा'
श्री-ग-णे-शा

दसऱ्याचा सुमुहूर्त आजचा
पाटिवरी श्री पूजायाचा
आणि अंतरीं कोरायाचा, नूतन संदेशा
श्री-ग-णे-शा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35568 दि: 
क्रमांक नों दि: 30·

: १० :

# येते वंदनाला

शिवाजीच्या उत्कर्षास कारणीभूत होणाऱ्या प्रभावी व्यक्तींत जिजाईचें स्थान अढळ आहे. देव-दर्शनांत, भगवत्-भजनांत रंगणाऱ्या मातेचे सारे अवशेष शिवाजीच्या आचरणांत उतरलेले आपणांस आढळून येतात.

येते वंदनाला
सवें घेउनी जिवाच्या
शिव–चंदनाला

तुझी कृपा हवी नृपा
म्हणुनी न जाळी तुपा
न्याहाळणें तुझ्या रूपा
छंद नंदनाला

देवादिकांचें दर्शन
प्रक्षाळितें तनमन
आचरण दे वळण
नवें चरणाला

शक्ति-भक्तीच्या संगांत
रंगे शिवाचें हृद्‌गत
सदा सौंगड्यांत रत
चैन ना मनाला

विसमरून देहा–गेहा
कथा–कीर्तनीं रंगे हा
दूर कराया संदेहा
करी चिंतनाला

मायदेशाची कहाणी
याच्या रंगली लोचनीं
बरवें हे शिशुपणीं
यशो-वर्धनाला

किनारलें आसवानें
माझ्या शिवबाचें जिणें
होवो दिगंताचें लेणें
गुढ्या--तोरणाला

: ११ :

# पाठ हा पहिला रामायणीं

दादोजीने बाल-शिवाजीला दिलेला रामायणांतील हा पहिला पाठ.

पूजुनि ही अष्टभुजा  घे पहिला पाठ तुझा
बद्ध रहा पद्मासनिं अचल ठेव भाव मनीं
आणि ऐक रामकथा
जींत अखिल विश्व बघे
वंदनीय पुरुषार्था
" दशरथास पुत्र चार
परि रामावरि मदार
राम कसा ? चंद्र जसा
स्मित ज्याच्या अधारावरि - नयन सजल मेघापरि
कंठ सत्यवचन धारि - कर औदार्यास वरी
चरण चाल देत ताल
भारतिसे भोवताल
कुणाहि वाटे हवाहवासा
पुत्र असा
बोलावुनि त्याला जवळी
बोलला पिता विश्वासें
यापुढें अयोध्यानगरी
हेलावो तुझिया श्वासें

स्नेह हा पिता-पुत्राचा
कैकयिच्या नयनीं सलला
असुयेचा जहरीं बिन्दू
पापणींत क्रोधें फुलला
वदली, "हा भरत कुणाचा ?
बोला ! कां अडली वाचा ?
ऐकिला आजवर कानीं
कैवार पुरे रामाचा "
सांग शिवा !
काय वाटलें असेल परिसुनि
तें रामाच्या जिवा
राम म्हणाला, "हें सिंहासन
नको मला, भरताला द्या
परी अयोध्यापुरी असूं दे
एकदिलें नांदती उद्यां "
पाठ हा पहिला रामायणीं
गजान्त लक्ष्मी असुनी दारीं
देशहिता वनवास आदरी
जग त्यांचा आदर्श आचरी
शतकाशतकांतुनी
पाठ हा पहिला रामायणीं

: १२ :

# असाच भाला फेक

बाल शिवाजीला भालाफेक शिकवितांना दादोजीच्या मनांत आलेले विचार.

असाच भाला फेक
ह्या भाल्याने टिपुनि घ्यायचा, रिपु तुजला हरएक
आण पवित्रा ध्यानीं
ठेव असे कर दोन्ही
अढळ राहुनीं, अचल लोचनीं, लक्ष्य आपुलें रेख !
उरीं स्फुरण उतटूं दे
करिं बळ एकवटूं दे
विस्फारित भिवयांत चढूं दे आत्म्याचा आलेख
वय कसलें छाव्याला ?
निर्भय तो दाव्याला
झेपमाजीं ग्रासिल सहजी असुरांचा अविवेक
सरतिल दिन कष्टाचे
हेतु महाराष्ट्राचे
पुरतां, करितिल सह्यगिरीच्या सरिता तुज अभिषेक
तूं शिव-स्वप्न सतीचें
माझ्या प्रेय मतीचें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..................

अध्ययनीं ह्या जाण आपुल्या परवशतेची मेख
ती बघ माता दारीं
पाहि आपुली स्वारी
भाग्य तिचें मिरवील, दिगंतीं, "छत्र-पती मम लेक"

: १३ :

# येथें स्वातंत्र्य जगे

महाराष्ट्रांत स्वातंत्र्याशिवाय कधींच कांहीं जगूं शकलें नाहीं. शिवाजी आपल्या सौंगड्यांसह लुटुपुटीच्या लढाया खेळत असे. अशाच एका लढाईतील शत्रूबरोबरचा हा संवाद आहे.

"अम्ही येथलें स्वामी
आलों इथवर
बाहु – बलावर
पहाडका तूं चुव्वा
दिल्लिपतीचें
हें दल अमुचें
नरसिंहाचें
क्षणांत उडविल धुव्वा"

"ठायींठायीं
व्यर्थ बढाई
दर्प कधीं जिंकी न लढाई"

"घे तर सत्वर
हे वज्राचे घाव शिरावर"

" ढाल करींची पेलिल शिरिं या कडाडत्या आकाशा
फोल तरी गर्वाची ही तव ' अरे–तुरे'ची भाषा "
" अरे तुरे ? गर्वांतुनि या शौर्य स्फुरे
आकर्षि न शिरपेंच
खोविलें गर्वाने नच ज्यांत तुरे "

" फार उशीरा कळतें परि तें
गर्वाचें घर पोकळ तें
तरि वेगें हो मागे
जाण न तुज चित्त्याची
त्यापरि अडकित्त्याची
जाण पर्दीची माती
झांकिल देह क्षणान्तीं "

" दाखवि तरि बळ तें करिं "
" घे ! हवा ना घे! परि त्या आधीं पाहुनि घे—
—हें जग अवघें ! "

"अल्ला ! दिल्लीश्वरा !
ह्या देहाचें दफन कराया न्यावें येथुनि घरा "
" जीव-दान घे
कधिं न येथ
शरणागत मृत्यु बघे
परि इथुनी जा निघुनी
येथें स्वातंत्र्य जगे "

## : १४ :

# रंगलीं मावळचीं खोरीं

सौंगड्यांस पारतंत्र्याच्या गोष्टी सांगत असतांना शिवबाची वाणी रंगत होती आणि त्या रंगांत मावळची खोरीहि रंगत होतीं.

गनिमांच्या गोटांत करावी कशी बंडखोरी ?
याच क्रांति-स्वप्नांत रंगलीं मावळचीं खोरीं

सांगतां पारतंत्र्याच्या
सौंगड्यांस शिवबा गोष्टी
सीतेच्या अंकावरलें
रामायण रंगे ओठीं
कधिं कृष्ण-कालिया युद्ध
वर्णिता शिवा उन्मेषें
वळवुनी मुठी वदले ते
कलि अम्हीहि-तुडवूं ऐसे
परि कथा पंडु-पुत्रांची
कारुण्य वाहवी नेत्रीं
यात्रिकां महाराष्ट्राच्या
चैतन्य देइ गंगोत्री

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५९५४ विः काव्य
क्रमांक ........ नों दि: ३०।११।५

गर्जति सारे,
जयजयकारें,
अंतरिच्या हुंकारें,
" शिवसामर्थ्यापुढें यापुढें निरर्थ बळजोरी
रंगलीं मावळचीं खोरीं

मातेची सात्त्विक माया
वाणींत शिवा तव साके
म्हणुनि तुझ्या चरणापाशीं
मावळ-तल अवघें वाके
गोपाल अम्ही, तूं श्याम
वायुपुत्र आम्हि, तूं राम
मुक्तींत मायदेशाच्या
करुं सार्थ कुळाचें नाम
हांक तुझी कधिंही येतां
चित्त्यापरि घेऊं झेप
उन्मत्त रिपूच्या माथीं
रुधिराचा देऊं लेप
तुझिया संगें,
मन निस्संगें,
लहरें स्वप्न-तरंगें,
अटी-तटीनें लढूं ठाकतां मृत्युहि सामोरी
रंगलीं मावळचीं खोरीं "

: १५ :

# तरला गाथा

बाल-शिवबा म्हणजे जिजाईच्या जीवनाच्या इंद्रायणींतील गाथा! महाराष्ट्राची शतकाशतकांची व्यथा दूर करण्याचें सामर्थ्य तिच्यांत होतें.

कालौघांतिल ये शिव हाता
मनोरथांचा तरला गाथा

जागरणाच्या सरत्या रात्री
ये चितूशक्ती विरल्या गात्रीं
भिजली तृप्ती भरल्या नेत्रीं
फुलली कल्पलता
....तरला गाथा

होइल आतां ब्रूज गुणांची
स्मृती उरीं राहील ऋणांची
विरतिल नातीं अहंपणाची
सौजन्यें लवतां
....तरला गाथा

मायदेशाची आतां माती
मुक्तीस्तव उधळेल दिगंतीं
झांकिल मार्तंडाची कांति
शौर्यें थयथयतां
....तरला गाथा

खड्ग येथल्या दरीदरीचें
कडे किनारिल सह्यागिरीचे
वक्ष विदारिल मत्त अरींचें
आणाया समता
....तरला गाथा

पाहुनि मम शिवबाचें ताण्डव
खचेल सम्राटाचा माण्डव
म्हणेल कुणि, "आतां हा पाण्डव
नमविल सम्राटा"
....तरला गाथा

भाग्य आज, मी माय तयाची
किमया करिं ज्याच्या मुक्तीची
भाग्यवान त्याहून उद्यांची
महाराष्ट्र - माता
....तरला गाथा

: १८ :

# मी सारथी या शिवाचा

शिवबाच्या शिक्षणाची जबाबदारी जिजाबाईने सर्वस्वीं दादोजींवर सोंपविली होती. ती जबाबदारी अंगीकारतांना दादोजींची भावना पुढील-प्रमाणें साकारली. खऱ्या गुरूची शालीन वृत्ति पुढील चरणांत आपल्याला दिसून येईल.

शिवा राजनीतीतलें पाठ द्यायाा
मला गौरवें बोलवीतां घरीं
उरीचा मुका भाव स्वप्नांतरींचा
फुले आज आकाश-पुष्पापरी

हृदींचें तुझ्या ध्येय साकार व्हाया
गुरुत्वार्थ माझ्या पदीं योजिसी
कळेना परी केविं तूं मृत्तिकेच्या
शिरीं कस्तुरी-गंध संयोजिसी

उतारांतलें आयु वेचीत होतों
जगापासुनी दूर मी चिंतनीं
"यशाचें मला श्रेय लाभो" असावा
असा हेत विश्वंभराच्या मनीं

शिवासारखा शिष्य ज्याला मिळाला
खरें श्रेय त्या ज्ञान-दानांतलें

पिपासा दिगंतास लंघून जाते
झरे शुष्क होतां निदाघांतले
जिथें भाव–सामर्थ्य लागे पणाला
जिथें शब्द कोरीवलेण्यापरी
तृषा शांतवाया तिथें अर्जुनाची
करीं ज्ञानगंगा धरी श्रीहरी

उद्यांच्या महाभारताची करीं ह्या
जरी प्रेरणा मानिसी, माउली
विनंती तरी एक " वृद्धापकाळीं
मिळो या जिवाला तुझी साउली"

तुझ्या प्राण-ज्योतींत ओतीत स्नेहा
दिगंतीं तिचें तेज विस्तारिन
पदीं शिष्य ज्ञानार्जना नम्र होतां
पुरेपूर द्यावें गुरूने ऋण

अतां जाण, मी सारथी ह्या शिवाचा
अतां मुक्तिचें स्वप्न जागेपणीं
अतां सार्थकीं लागलेलें जिणें हें
सरूं दे महाराष्ट्र-उद्धारणीं

तुला वंदितों आर्यमाते ! न कोणी
तुझ्यावीण व्यक्तित्व हें स्पर्शिलें
गुरुत्वा उद्यां काळ पूजील ज्याच्या
महाभारतांतील नात्यामुळें

३५६७८ वि: काव्य
नों: दि: ३०-११-८५

: १७ :

# सुख कौसल्येचें

आपलींच घरेंदारें, आपलेच लोक भंवतालीं दिसत असतांना, भरदिवसा हवं तें लुटून नेणारीं हीं माणसें कोण ! " असा प्रश्न बालशिवाच्या मनापुढें उभा राहिला. जिजाई आणि शिवाजी यांच्यातील हा संवाद आहे.

जिजाई : घरदारें अपुलीं, आपुलेच जरि लोक
भयभीत लोचनीं तरिहि तयांच्या शोक
कुणि घुसे लांडग्यापरी गनिम घरिंदारीं
घे लुटुनि हवें तें भरदिवसा बिनधोक

बालशिवाजी : बोलसी गनिम ज्या, मुलुख तयांचा कोठें ?
घरदारें लुटिती म्हणुनि काय ते मोठे ?
मोठेपण न मिळें असें दांडगाईने
पाठींत अशांच्या हवे हणाया सोटे

जिजाई त्या कड्यापलिकडे दूर तयांचा गांव

बालशिवाजी : मग अपुलाहि कां जिंकायाची हाव ?
वाटतें किति मनीं मद त्यांचा उतरावा

जिजाई : बळ परंतु अपुलें कसा धरील टिकाव ?

बालशिवाजी : थांब तूं ! आणि मज जरा होउं दे मोठा
हरएक युक्तिने मिळविन मर्द मराठा
पाहशील तूं, हा तुझ्या कुशींतिल छावा
धूळींत लोळविल उन्मत्तांचा ताठा

जिजाई : शाब्बास ! भाव हे तुझ्या ऐकुनी ओठीं
जाहलें कितीतरी होतें त्याहुनि मोठी
तूं राम, जागतें स्वप्न तुझें रक्षेंत
सुख कौसल्येचें आज साठलें पोटीं

: १८ :

# आली टोळधाड

[ या अभंगांतून शिवकालीन संतांच्या मनोवृत्तीचें दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

आली टोळधाड वाढे पालवीचें भय
जगायच्या लालसेला मरणाची सय

माझें–तुझें'ची अहंता गळे पायतळीं
आसक्तीच्या पाशांतून इंद्रियें मोकळीं
शिव–स्वरूपें साकारे आत्म्याची पोकळी
कोठलेंहि शिलातल आतां देवालय

तृप्ति भुकेला तुपाची अनंत चिंतनीं
भूत-भविष्याची चिंता विरे आचमनीं
शिव-दर्शनाची चढे भावना लोचनीं
देहाची या होते तशी होवो हयगय

आनंदवनाची आम्हां संतांवरी छाया
पायवाटेला न बंध कोठेंही वळाया
हवे–नको तें साऱ्याचें पाही शिवराया
तोच एक रोधील हा रक्ताचा प्रलय
तक्त असावें, भूपाळ आसक्त नसावा

भक्त पार्थापरी त्याला    निरंत दिसावा
धर्मराजाचा आदर्श    अंतरीं ठसावा
स्वप्नींहि न 'मम'त्वाचा    करावा विक्रय

महाराष्ट्र देश माझा    मनानें महान
बंधमुक्त व्हाया त्याची    तपांची तहान
इथें शौर्य शार्दूलांचें    ग्रासितें अस्मान
माझ्या बद्ध-पद्मासना    छंदांचें वलय

अनुक्रम ३५६०४
क्रमांक ....२५१८........ वि: ०।१५
नों: दि: ३०-११.

## : १९ :

# किनारते विजिगीषा

संध्येच्या चढत्या घटकांत शिवाजी एका दरडीवर बसून चिंतन करीत आहे. स्वातंत्र्याच्या कल्पवृक्षाचे नवनवीन मोहर त्याच्या स्वप्नाळू नजरेपुढें झुलत आहेत.

मनांत माझ्या ह्या एकांतीं मोहरती संकल्प नवे
कधीं भारल्या नयना भासे स्पर्शाया त्या गगन लवे
वडिलार्जित जिंदगी जरी ही पुण्या-सुप्याची जहागिरी
हवा जातिच्या तरि शार्दूला विक्रीडीता मत्त करी
"शतकांच्या शृंखला निखळतिल केविं माय-भू-चरणींच्या"
अंगारापरि जळति भावना....समिधा अंतःकरणीच्या

"विश्व-विजेता झाल्याविण नच सार्थक जगल्या देहाचें
भाव जपावा कुणिहि उरीं परि बंध असावे स्नेहाचे
मूठ असावी खड्गासाठीं, अंजलींत परि गीताई
सौजन्याविण सामर्थ्याला दिगंतांत मोल न येई"

"ऊठ आणखी लूट हवें" धर्म (!) आमुच्या जेत्यांचा
कैवारी कुणि उरला आज न जळतां घर हळहळत्यांचा
दर्‍यादरींतिल खेडयामधल्या व्यथा येथल्या वाऱ्यांत
"नाच कसा उन्मत्तपणाचा चाले सत्ताधाऱ्यांत ?"

स्वातंत्र्याचा कैफ न जोंवरि चढला येथिल मातीला
हवा तसा संचार करो ह्या नराधमांच्या जातीला
परी दंडकारण्य पेटतां, भिडतां गगना अग्नि-शिखा
विहंगमांच्या थव्यापरी परतेल अरी अपुल्या मुलुखा
मनास माझ्या, ह्या एकांतीं चढत्या अंधारांत अशा
किनारते विजिगीषा, ज्यापरि पर्वतराजी आकाशा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५६७४ वि: ८१०५
क्रमांक ९५१८ नों दि: ३०·११·६

: २० :

# शौर्य डफाचें

शिवकालीन किल्ल्यांचा बुरुज नव्हे, दरवाजा नि दरवाजा **'मराठ्यांचें शौर्य डफाचें'** होतें याची साक्ष देत आहे.

"कुठें मुरारी माझा ?"
अजूनि कण्हतो पुरंदराचा दरवाजा
 बघून या, जा !

वज्रगडावर, कंदकड्यावर
जोहाराचें झडलें संगर
दिलेर सत्तांधांचा हल-धर
 राखित होता सज्जा

अहि-नकुलांचें वैर युगांचें
तिथें स्वैर भाल्यावरि नाचें
त्यांत बाजिचें शौर्य डफाचें
 गर्जे, "मरुं शिव-काजा"

घेउनि संगें शेर सातशें
मुरारबाजी भिडला त्वेषें
गनिम परंतु नव्हते मेषें
 दोघांचा हो फज्जा

त्या शौर्यें मार्तंडहि लपला
काय नवल मग दिलेर दपला
परी अखेरीं हिरा हरपला
 विखरित अपुल्या तेजा

: २१ :

# तोरण दिग्विजयाचें

रुद्राप्रमाणें प्रलयाचें शिंग फुंकणाऱ्या शिवबांनी सोळाच्या आसपासच कांही किल्ले जिंकिले. तेव्हां जिजाईनीं गायिलेलें हें गीत.

धन्य जाहलें आज पाहिलें तोरण दिग्विजयाचें
मी माता तव, केविं करावें कौतुक बाल-वयाचें ?
अजुनि न शैशव सरलें पुरतें, पुरति न अजुनी सोळा
तोंच तुझ्या ह्या शौर्याभंवतीं झालें मावळ गोळा
म्हणती आले-गेले " अपुल्या दैव उभें पाठिशीं
दैवावांचुनि आकाशींचें स्वप्न न येइ उशाशीं "
दादोजीसम लाभे गुरु, हें भगवंताचें दान
गुरुत्वांत ह्या शिवा उद्यांचा तुझा मान-सन्मान
शौर्य तुझ्या वडिलांचें आणिक शील तुझ्या आईचें
'शौर्य-शीलता' ब्रीद होउं दे तुझिया शिवराईचें
भिक्षेमागिल हेतु कळूं दे तुला रामदासांचा
अन् तुकयाचा छंद कळूं दे पांडुरंग-ध्यासाचा
कुंकुम-रागें इथें चितारी भक्ति कर्मयोगास
शिलेदार येथील न कधिं हो उपभोगाचा दास

करिती हितगुज तुझिया कानीं सह्यगिरीचे वारे
ज्यांच्या प्रक्षोभांत उधळतिल मत्तांचे बंधारे
आज कुठेंतरि घटका घटका रंगुनि एकांतात
"केवि शिरीं पेलावें" चिंतिसि, "अरिचे वज्राघात"
रीत नवी लढण्याची ही तव चकविल दिल्लिपतीला
लाखांचे सरदार बोलविल तोही मग दिमतीला
द्वंद्व जाहलें सुरू अतां, हा त्यांतिल पहिला पेंच
'अरे-तुरें'तुन टिकवायाचा आहे तुज शिरपेंच
फुंकिलेंस रणशिंग शिवा तूं रुद्रापरि प्रलयाचें
धन्य जाहलें आज पाहिलें तोरण दिग्विजयाचें

: २२ :

# भ्रमण

आदिलशहाच्या दरबारीं आपल्या पित्याला भेटायला गेलेल्या शिवाजीच्या अस्वस्थ मनोवृत्तीचा शब्द-रूप आविष्कार.

माझ्या मना! समजलें तूं असा बेचैन कां ते? पित्याच्या दर्शनासाठीं इथें आलेला मी....आदिलशहाच्या दिमाखानें दिपून जाऊन माझेपण विसरून गेलों, असाच ना तुझा समज झाला?

पण नाहीं. केवळ उंचीच्या बाबतींत मेघांशीं स्पर्धा करणारे येथलि सुल्तानाचे संगमरवरी प्रासाद—

येथील रंग-महालांत मदालसेच्या भारावलेल्या पापण्यांत उतरलेलें इष्काचे रंग—

ते रंग माझ्या स्वप्नांचे नाहींत याची मला जाणीव आहे. त्या रंगांत अमानुष अत्याचाराच्या सहाय्यासाठीं धाऊन येणाऱ्या 'ब'च्या बाराखडींतील साऱ्या अवगुणांचे अवशेष आहेत.

'जरुरीपेक्षां अधिक जवळ असावें' या स्वामित्व भावनेनें मनुष्य एकदां पछाडला गेला कीं त्याची वृत्ति आक्रमक बनतें. तींत असुरीपणा उतरतो.

याचे दाखले शिवनेरीवरील शिवालयाच्या नंदादीपापाशीं आईनें सांगितलेल्या महाभारतांत कांहीं कमी नाहींत.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६०८ वि: काव्य
क्रमांक ........ नों: दि: २०.११

पण मला त्यांचेही दर्शन घेऊं दे !

मस्तवाल अमीरांच्या हत्तींना अंबारीसह ऐसपैसपणें पलीकडे जातां यावे इतके हे विशाल दरवाजे —

खासकट साऱ्या लौकिक सुखोपभोगांत अहर्निश मश्गूल राहणारे हुजूरचे हे हैवान—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११७६३
शाखा (स्थळ प्रत)

आणि उद्बत्तीच्या स्पर्शानें चढलेल्या धुंदींत पंचक्रोशींतील प्राण पिंजावयास पिसाटासारखी धावणारी त्यांची हीं मग्रूर मुलुख--मैदान —

यांनीं माझी चित्‌शक्ति किंचितहि उणावणार नाहीं. उलट माझा आवेश उफाळून येईल. आदिल्‌शाहीची तैनात सांभाळणाऱ्या माझ्या पित्याच्या डोळ्यांत ज्वलंत राष्ट्र–तेज आहे. पण जीवनांत आलेल्या अपशयामुळें तें लपल्याप्रमाणें वाटतें.

तेव्हां पितापुत्राची ही भेट सह्याद्रीचा चिरा न् चिरा पेटविण्याइतकी प्रभावी ठरणार आहे. पित्याचे हेतु तर-तमभावनेनें दक्क्षेपांत टिपून घेण्याची कला कौसल्येनें रामाला शिकविली म्हणूनच वानरसेनेच्या सहाय्यानें त्याला महासागरावर सेतु बांधिता आला. नाहींतर लंकेंत पाऊल टाकणें रामाला अशक्य झालें असतें. कृष्णेच्या अथांग प्रवाहाप्रमाणें प्रौढेच्या भावगर्भ स्पर्शानें माझ्यांतील मनीषा फुलत ठेवणाऱ्या मातेनें ती दृष्टि मला दिली आहे.

लाचारीनें लुळी बनलेली आणि आसक्तीच्या पुंगीवर फणा टाकणारी विषधरांची ही शराबी मनोवृत्ति पिंजून काढायला सह्याद्रीच्या वृक्षराजींच्या डोहलींत राहणाऱ्या ह्या अस्मान–स्पर्शी गरुडांना फारशा घिरट्या घालाव्या लागणार नाहींत.

माझ्या मना ! असा साशंक होऊं नकोस. हा बघ फिरलो मागे. हंसाच्या पंखानें आलों आणि गरुडाच्या पंखानें निघालों. यापुढें नीर-क्षीर विवेक संपला. आतां फक्त स्वातंत्र्याचा ध्यास. परवशतेच्या अन्यायानें अंगारलेली गात्रें अनंताच्या अंकावरील कलशांतील अमृताच्या अभिषेकानें पुलकित होईतोंवर सारखे भ्रमण....या भ्रमणांतील पावलापावलागणिक स्वातंत्र्याच्या शिव-स्वप्नांचे ठसे उमटणार आहेत.

: २३ :

# तांडव हें रुद्राचें

शिवाजीने आरंभिलेला स्वातंत्र्याचा लढा ऐन रंगांत आलेला आहे. शंकराच्या तांडव-नृत्यांची स्मृति व्हावी इतकी त्यांत प्रखरता आहे. अशा घटकेला तो संग्राम प्रत्यक्ष पहाणारी व्यक्ति हेच विचार व्यक्त करील.

तांडव हें रुद्राचें
ज्वालामय पापण्यांत बघ त्याच्या
रसरसल्या लाटा ह्या प्रलयाच्या
रक्तांकित होतिल झणिं ज्यांत थवे गृध्रांचे
लाख लवायास हव ज्या हुजरे
आणि हवे वरकरणी ज्या मुजरे
डावपेंच ढासळतिल त्या प्रमत्त क्षुद्रांचे
तख्त हवें त्या मानव ताराया
न्याय हवा अन्याया वाराया
राजर्षिस बघुनी ज्या शिर नमेल इंद्राचें
थयथयच्या पदिं त्याच्या थरथरती
भीति-चकित कणकणांत ही धरती
प्रलयंकर हा थिजवी रक्त रोम-रंध्राचें
शतकांचा परवश-तम क्षाळाया
जाग शिव हा खल निर्दाळाया
कर्मयोगरत पुरुषा भाग्य भालचंद्राचें

: २४ :

# याच शमीच्या वृक्षाखालीं

जसजसा देह वाकत गेला, तसतशी दादोजींची उमेद कमी होत गेली. मनांत चिंतेने घर केलें. त्याप्रसंगीं जिजाबाई म्हणते.

याच शमीच्या वृक्षाखालीं क्षात्रतेज प्रकटलें
शिवाचें क्षात्रतेज प्रकटलें
भयें जयाच्या शौर्य रिपूंचें बाहूंतच गोठलें

शक्ति-भक्ति व्यवहार नीतिचे पाठ इथें गिरविलें
शिवाने पाठ इथें गिरविले
दिगंत गरुडापरी किनारित पन्नग भिरकाविले

दुरावलें माहेरा, मुकलें पितृसुखा मन्मन
शैशवीं पितृसुखा मन्मन
पिताच मज भेटला धरेला ज्यापरि श्रावण-घन

चित्‌शक्ती मम, तुझी प्रेरणा, साकारत चालली
शिवहृदीं साकारत चालली
गुरु-देवा ! ती नको रहाया अमूर्त स्वप्नावलि

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

देह वाकला वयें, नका करुं चिंता तुम्हि तिळभरी
उद्यांची चिंता तुम्हि तिळभरी
पिढ्या-पिढ्यांना मिळेल तुमच्या सोन्याची भाकरी

द्या आशीर्वच शिवास मम, तो वाके तुमच्यापुढें
गुरुत्वें वाके तुमच्यापुढें
तेज तयाचे शिरीं धरूं दे सह्यचलाचे कडे

बारा मावळ-तलीं विखुरलीं अतां क्रांतिचीं दलें
शमीचि न अतां क्रांतिचीं दलें
याच शमीच्या वृक्षाखालीं क्षात्रतेज प्रकटलें

## : २५ :

# चरण राघवाचे

समर्थांच्या पदीं शिवाजीने आपलें सर्वस्व अर्पण केलें तेव्हां ते काय म्हणाले असतील ?

विश्वाहुनि प्रिय अम्हांस चरण राघवाचे
राज्य पदीं वाहासि परि काय अम्हां त्याचें ?

चाफळच्या खोऱ्यांतिल
झुळझुळतें प्राशुनि जल
भाव झऱ्यापरि निर्मल
बोल लाघवाचे

अम्हि ह्या आनंदवनीं
फुंकितों तुझाच ध्वनि
शब्दांचें ईश-मणी
सूत्र अन् स्वराचे

दास अम्ही, नच स्वामी
रात्रंदिन रत रामीं
खाया ल्याया न कमी
बंध ना भवाचे

मी अखंड पदयात्री
शीण कधींहि गात्री
'शांति-सौख्य सर्वत्रीं'
स्वप्न यात्रिकाचें

तोडिलेस वाघनखें
तूं म्लेंछांचे लचके
शौर्य तुझें लववुं शके
दिवस वैभवाचे

शिव ठेवुनि दृष्टिपुढें
जोंवरि पाऊल पडे
मार्गीं पडतील सडे
राष्ट्र-गौरवाचे

तूं शिव, तव तांडवांत
शक्ति नवी पांडवांत
रोधिले प्रचंड वात
काळ-कौरवांचे

: २६ :

# तीं पदींचीं जोडवीं

कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजीने सालंकृत परत पाठविली. असा मराठ्यांचा राजा हें महाराष्ट्राचें भूषण आहे. भारतीय संस्कृतीची उंची वाढविणारें एक दैवत आहे.

दौलतीची लूट मानूनी तुला
आणिली आर्यांगने माझ्यापुढें
काय माझी राजनीति तोलण्या
दैव घाली अच्युताला साकडें

पाहुनी स्वर्गीय लावण्या तुझ्या
मुग्ध झालों मीहि दर्बारासवें
"संयमी आसक्त व्हावा ना कधीं
धर्म हा माझा नृपाळाचा लवे ?

कोण तूं ? अन् कोठली ? येथें कशी ?
कां कसाई पाहि गोमाता फशी ?
सांग ही माझी सुभेदारा असे
"दंगलीची आधिं व्हावी चौकशी"

मौन कां हें ? सांग तूं, जाणें कुठें ?
भीतिनें कां शब्द ओठीं ना फुटे ?

जाण तूं केव्हांहि ह्या तक्तापुढें
यावया अन्याय पायीं लट्लटे

दर्शवी आर्ये ! मला तो एडका
ओढिलें ज्याने बलात्कारें तुला
लोटितों त्या मत्त हत्तीच्या पदीं
जाणुं दे न्यायालयाचा दाखला

राज्य हे मानी 'परस्त्री देवता'
राष्ट्र–सामर्थ्या हवी ही साधना
'राहसी याझ्यापुढें लाचार तूं'
दृश्य हें देतें मनाला वेदना

'सून थोरांची,' असें मी ऐकतों
जा घरीं ! सांभाळ तूं तो उंबरा
आणि हा आहेर तक्ताचा तुला
ज्यांत पाही माझिया अभ्यंतरा

थांब गे तेथेंच, तूं सालंकृते !
न्याहळूं दे तीं पदीचीं जोडवीं
पूजिते लेण्यापरी ज्यांना सती
संस्कृती गाते जयांची गोडवी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## : २७ :

# सुरत न ही, लंका

शिवाजी महाराजांनी अनेकदां सुरत लुटली. पण मराठ्यांची दौलत लुटणाऱ्या मुसलमान गनिमांची भावना आणि छत्रपतींची सुरत लुटण्यामागील भावना यांमध्यें केवढा फरक आहे.

लुटिली सुरत न ही, लंका

प्रासादाच्या पदिंची माती
पर्णकुटी धरि अपुल्या माथीं
उदरंभरणास्तव हीं नातीं
राव पिळी रंका

तक्तावरला डासहि येथें
येतो, उचलुनि नेइ हवें तें
मराठे न हे आतां प्रेतें
उरलि न त्या शंका

शिवाशिवाच्या ह्या संग्रामीं
सह्यशक्ति मम येवो कामीं
भय-विस्मित रिपु अंतर्यामीं
झडे हाच डंका

खैबर खिंडीतिल हे फंदी
जीवन सुरम्याचें स्वच्छंदी
उतरू दे सुरईची धुंदी
लाखांचा तनखा

महान रङ्गा देइ मराठा
खान पळाले करित 'ठंठा'
इष्काचा लंघुनि उंबरठा
उधळुनि पर्यंका
लुटिली सुरत न, ही लंका

: २८ :

# अचल तरी मी

शिवाजीच्या बंडखोरीमागे शहाजीचा हात आहे असे समजून आदिलशहाने शहाजीला कैद केले. त्यावेळीं त्याच्या दरबारांतील एक सरदार जिजाईला सांगतो. जिजाबाईचें बाणेदार उत्तर मराठी रक्ताचें आणि भवानी भक्ताचें प्रतीक वाटतें.

**सरदार :** "बोल ! सौभाग्याचें दान हवें तर
बंडखोर ह्या अवलादीसह विजापुरी चल !
आदिलशहाच्या तक्तापुढती कर मनधरणी
विनवि तयाला "क्षमावंत व्हा !
चुळ्याचें मम हें शिशुरंजन....मी चुकलें"

**जिजाई :** "चुकले ? डाव जराशी हुकले
भलतिकडे ग्रह झुकले
नातर....! नव्हतें तें शिशुरंजन
शिव-शौर्याचें अंजन"

**सरदार :** "आवर जिव्हा ! काळापरि तुजपुढें उभा मी"

**जिजाई :** "अचल तरी मी अंतर्यामीं
ही शिवमाता
कुणा न येइल सहज नमविता
दैवत मानी एक भवानी"

**सरदार :** "बंद करी भक्तीची भगभग
भवानी ?– पाषाणाची ती पिकदाणी
थूं....तिच्यावर "

**जिजाई :** "श्वानापरि तूं थुंक तिच्यावर
भुंक तिच्यावर तुला हवे तर
परंतु ह्या आर्येची भक्ति
मत्तांची नाकरिल सक्ति
भाव हवा जिंकाया देवा "

**सरदार :** "बोल पुन्हां भानावर येउन "

**जिजाई :** भान हरपलें तुझें....न माझें
तूं तक्ताचा केवळ हुजरा
उदरंभरणा करिसी मुजरा
उभे शिवाच्या मागे मावळ
दिल्लिपतीसहि करील हतबल
जा....!आदिलशहाला कळवी निश्चय माझा !
कधीं न हा शिवराजा
परसत्तेचा बंदा परपिंडाचा मिंधा
जाण फिरुनि हें....
पदर उरींचा शिव माझें झाकाया
तुजपुढें न वाकाया

## : २९ :

# व्यापिली खानाने जावळी

अफझुलखानाचें पारिपत्य हा शिव–चरित्रांतील अमर प्रसंग. त्याचें वर्णन शाहिरांनीं अनेक प्रकारें केलेलें आहे. पण जावळीच्या खोऱ्यांत त्यानें ठाण मांडल्यावर जिजाईच्या मनांत जे विचार आले, ते पुढील कवनांत मांडलें आहेत.

माइ भवानी विजापुराला हवा शिवाचा बळी
व्यापिली खानाने जावळी

घेउनी प्रेरणा तुझ्याच डोळ्यांतिल
उभविलें तयाने सह्यतलांतुनि दल
उधळिले येथले नराधमांचे तळ
बलशाली सकलांत बोलती, "गज पेली करतळीं"—

राहुटिने त्यांच्या गजबजली ही दरी
हालचाल बघुनी धडकी भरते उरीं
तारणें लेकरा आतां तुझिया करीं
रसगुल्ल्यापरि रसना त्यांची, परि काळिज काजळी—

मी जाणि, शिवाचें स्वप्न तूंच फुलविसी
भक्ति-भाव त्याचा घुमे तुझ्या मानसीं
परि अशुभ-चिंतनें झालें वेडीपिशी
खिळते दृष्टी तेथिल सृष्टी दिसते रक्ताळली—

अनुकूल कौल दिधलास आजवरि अम्हां
शिव - भालिं जयानें खुले कीर्ति-चंद्रमा
आजही तसा दे, करि चुकल्यांची क्षमा
यशो–भावना मला वाचुं दे तुझ्या पापणींतली—

लावील शिवा पणिं शौर्याची संपदा
झेलील सहज शिरिं वज्रापरि आयुधा
आशीर्वच तरि तव हवा फिरुनि एकदां
भाव सद्गदे आज वाहतां मानस-पुष्पांजलि
व्यापिली खानाने जावळी

: ३० :

# प्रसंगीं रोधुं सहस्राक्ष

घराघराच्या उंबरठ्यावर ' जय जय रघुवीर समर्थ ' असा खड्या स्वरांत उद्घोष करणाऱ्या रामदासांच्या मुखांतील प्रस्तुत गीत मराठी मनांत जागणाऱ्या शिव-स्वप्नांतील आत्मविश्वास दर्शवितें.

शिव-स्वप्नांची साक्ष
गळ्यांतिल देतिल रुद्राक्ष

सद्धर्माची होळी
जिथें तिथें मन पोळी
म्हणुनि घेतली झोळी
पहाया जवळुनि दुर्भिक्ष

उदासीन अम्हि नित्य
जपत उरीं शिव-सत्य
आचरणांत अगत्य
चिरंतन मुक्ति-सुखीं दक्ष

सम्राटाची सत्ता
केवळ द्याया लत्ता
प्रीतीविण गुणवत्ता
होतसे काळाचें भक्ष्य

दास अम्ही रामाचे
प्रेमा - सद्धर्माचे
उरिचें ओठीं नाचे
अमुचें ब्रह्मपदीं लक्ष

कुणी न उजवा-डावा
मानव तो जोडावा
अडवि तया तोडावा
भिडवुनी वज्रासहि वक्ष

ध्वज भगवा हा हातीं
रक्षितसे सद्वृत्ति
आक्रमितां आसक्ति
प्रसंगीं रोधुं सहस्राक्ष

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34८८४ वि: ...
क्रमांक ...१५३८... नों: दि: ...

: ३१ :

# क्रांति-पुष्प

जिजाईच्या पूजेंतील हें एक क्रांति-पुष्प. परवशतेच्या दाहकतेनें अंगारलेल्या तिच्या भावनांचें चित्रण यांत केलेलें आहे.

देऱ्हाऱ्यांतुनि ऊठ शिवांगे ! क्रांतिरूप हो अतां
कुरु-क्षेत्र धगधगो, जळूं दे परवशतेची व्यथा
त्रिशूल-परशू-चक्र-गदादिक उचल आयुधें झणीं
धरणीधर डळमळो, विऱ्हळो स्पर्शें तेजस्विनी !

अंगाराची दाहक लाली भालीं बघुनी कुणी
म्हणेल, " ही शिव रक्षाया ये महिषासुरमर्दिनी "
चित्‌शक्तीनें तुझ्या प्रस्फुरो दरीदरी येथली
शार्दूलांचे जथें गर्जु दे बारा मावळतलीं

सह्यगिरी उठवाया पौरुष रुद्र-शक्तिचें हवें
उधळिल विंध्याचला पलिकडे जें गृध्रांचे थवे
सुलतानी सत्तेंत काजळे मम स्वप्नांची कडा
तुझ्या सहाय्यावीण भरेल न तृप्तीचा हा घडा

क्षुधा शमे अन्नाविण, भागे जलावांचुनी तृषा
मुक्ति न जेथें निशा कुठें ? जागेपण पाही उषा
कौसल्येचा राम वाढतो उदरीं निमिष-क्षणा
दशानना जिंकिलें जयानें संतांच्या रक्षणा

ये अविलंबे ! चल जगदंबे ! क्रांतिरूप दर्शवी
दुष्टाच्या दाढेंत दडालीं मनें पुन्हां हर्षवी
आज तुझ्या पूजनीं उरीचें क्रांति-पुष्प वाहते
ज्यांत उद्यांच्या शिव-स्वप्नांची परिपूर्ती पाहतें

: ३२ :

# केवळ खड्गाशीं नातें

नागोजी जेधे हा शिव-स्वप्नांतील एक तेजस्वी तारा. रोहिडच्या खोऱ्यांत त्याने गाजविलेल्या पराक्रमाचें हें कथन. 'केवळ खड्गाशीं नातें' असणाऱ्या ह्या मराठ्यांनीं प्रभंजनाच्या वेगांत हत्तीवरून येणाऱ्या पठाणांचा हल्ला परतविण्याची पराकाष्ठा केली. पण......

ज्या युवकाने पदीं नमविलें आदिलशहाच्या तोऱ्याला
नागोजीचें नांव असावें त्या रोहिडच्या खोऱ्याला
कृष्णा-तुंगेच्या तीरावर कोप्पळचा आहे किल्ला
किल्ला कसला गुहाच भासे, जिथें अमानुष बिस्मिल्ला
त्या ठाण्यावर पठाण होते दोघेजण भाऊ भाऊ
ग्रासूं बघती वातावरणा ज्यापरि ग्रह केतू-राहू
तुडवित होते कर्नाटकचें जीवन सत्तेच्या पायीं
धर्मबंध गृहसंबंधाची तमा न छळल्याच्या ठायीं
क्लेश कुणा हे सांगावे ? तो कुठें आपुला कैवारी ?
याच विचारीं जनता सोरी, असतांना ये शिव दारीं
कानांवरती होतें त्यांच्या राम महाराष्ट्रांत असे
शौर्यासाठीं मूठ जयाची, औदार्यास्तव आणि पसे
शिवबाने जाणिलें दुःख तें आणि मोहिल्या सैन्य दिलें

असें जयांच्या खड्गाघातें उतरतील रिपु-कानशिलें
त्यांत धनाजी जाधव आणिक नागोजी जेधे होते
पिढ्यापिढ्यांतुनि होतें त्यांचें केवळ खड्गाशीं नातें
पठाण आले हत्तीवरुनी प्रभंजनाच्या वेगांत
लोट धुळीचे उठले इतुके दिवसाची झाली रात
नागोजीने जरा पाहिलें फणा पाठिचा ताठवुनी
फणा डिंवचिल्या नागाचा जणुं दंश कराया सिद्ध मनीं
खान चरकला बघुनि तयाची गंडस्थलभेदी झेप
आणि म्हणाला 'चल माहूता अश्वावरि हत्ती चेप'
अश्व-गजांची शिव-अशिवांची झुंज पेटली प्रहरभरी
एकाएकीं येउन रुतला नागोजीच्या बाण शिरीं
तरिहि मराठे पिंजित होते फौज रिपूंची भाल्यांनीं
देह माखले घामानीं अन् रक्त-मातिच्या काल्यानीं
रणांत पडला पती समजतां नवपरिणीता गोदुमती
निघे जावया सती, सख्याविण उरे कुठें संसार-रति
धन्य काळ तो जयें स्पर्शिलें शिव-स्वप्नांतिल ताऱ्याला
नागोजीचें नांव असावें त्या रोहिडच्या खोऱ्याला

: ३३ :

# कधीं न घडलें, घडे

दख्खनच्या पठारावर आपल्या अमानुषतेचा नंगा नाच करणाऱ्या दिल्लीपतीने शिवाजी महाराजांना आग्रा येथें बोलावून त्यांचा भर दरबारांत अपमान केला. त्यावेळीं शिवाजी महाराजांनी जें उत्तर दिलें तें ऐकून औरंगजेबापाशीं शेळीहूनहि गरीब झालेल्या रजपूतांच्या मनांत असेच विचार आले असतील—

उधळिल्या जयाने दख्खनच्या दौलती
भेटाया गेला शिव तो दिल्लीश्वरा
ऐश्वर्य अहंतेसवें बघुनि तेथलें
थबकला सिंहसा तक्तापुढती जरा

नजराणा ठेवुनि सम्राटाच्या पदीं
शिवराय परतला सौजन्यें मागुती
क्षितिपती स्वागतापरि न जाहला पुढें
दप्तरीं जयाच्या इस्लामी संस्कृति

याहून उपेक्षा करावया आणखी
रांगेंत मागल्या त्याला केलें उभें
प्रेरि जो महाराष्ट्रास आपुल्या बळें
तो विक्रमशाली भूप कुणाहि न दबे

गर्जला, "कौन है हमसे आगे खडा ?"
हादरे तक्त, दरबारहि दबला क्षणीं
रजपूत रक्त मृत वदे, "इथें कोण हा ?"
अन् नमले कळतां 'शिव', गेले शरमुनी

परततां भग्न-हृद् तसाच गर्दीतुन
कुजबूज तयाच्या मागे कानीं पडे
" सिंहही जाहले शेळीसम ज्या स्थळीं
दरबारीं अजुनी कधीं न घडलें, घडे "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34६७8 वि: काव्य
क्रमांक ९५६८ नों: दि: ३०।११।६७

: ३४ :

# देह पडो प्रभुचरणीं

शिवकालीन इतिहासांत नांवाची सार्थकता कृतींत उतरविणारे शेंकडों वीर होऊन गेले. त्यापैकींच बाजी प्रभु एक होय. कायस्थाच्या कुळांतील ह्या बरकंदाजाने आपल्या धन्याचें शिव-स्वप्न प्राणाच्या बाजीनें जागविलें.

लढलों चढलों आणि आज ह्या पडलों राष्ट्रोद्धरणीं
आस फळा ये "ह्या बाजीचा देह पडो प्रभुचरणीं"
सांगतसे शिव, "स्वातंत्र्याचें स्वप्न फुलें शतकांनीं
मुक्तीची ललकारी अपुल्या कधिंहि न येइल कानीं
तरिहि आहुती माझ्यापरि तव हवी क्रांति-यज्ञांत
जन्मा आले, जगले मेले कितीतरी अज्ञात
धार चढूं दे खड्गांना ह्या, तटास वक्ष भिडूं दे
राष्ट्र-गीत उद्घोषित 'हरहर जय शिवशंकर' नादे
घावासरशी धुळीस मिळवूं कैफ मस्त हत्तीचा
आवेशाने गर्जु, मामला पुरे जबरदस्तीचा
सह्याद्रीच्या छत्राखालीं अवघी अमुची धरणी"
आस फळा ये, "ह्या बाजीचा देह पडो प्रभुचरणीं"

कानामात्रेंतुनि नांवाच्या भाव ओतिला आज
जगास कळले, कायस्थांच्या कुळिंही बरकंदाज
रात्रभरी झगडलों खेळवित लोळवीत रिपुरक्त
डोळे, नच हे ! लोळ अग्निचे करित पहारा सक्त
रक्तांकित हा देह होउं दे पावन या खिंडींत
स्वयंस्फूर्तिने तीर्थ उद्यां हें येइल कुणि धुंडीत
तोफांची ऐकिली सलामी, शिवा पोचला स्थानीं,
मृत्युंजय मी, मरण मलाही आलें इतमामानीं
चिराच झालों, शिवालयाची करितां पायाभरणी
आस फळा ये,"ह्या बाजीचा देह पडो प्रभुचरणीं"

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34448 वि: ९/०५
क्रमांक ९५५६ नों: दि: ३०।१२।६८

: ३५ :

# बैरागी हा नव्हे, शुभंकर

आग्र्याहून निसटल्यावर शिवाजी महाराज मजल दरमजल करीत घरीं आले ते बैराग्याच्या वेषांत. जिजाईने त्यांना ओळखलें नाहीं. नंतर तिला कळलें कीं हा बैरागी नसून महाराष्ट्राचा शुभंकर आहे.

**बैरागी :** भिक्षा वाढा माई !
तूंच शिवाची आई का गे ?
तर मग ऐक शुभांगे !
निरोप त्याचा,“ आहे मी सुखरूप
असाच घरिं परतेन एकदां येतां घडि अनुरूप ”
अम्ही उत्तरेकडले
अवाचित येणें घडलें
प्रेम आमुचें जडलें
म्हणुनि नृप वदला हें गुपचूप

**जिजाई :** ‘ बसा जरा मोकळे
आणिक सांगा इत्थंभुत हें
कसें तुम्हांला कळे ? ’

**बैरागी :** निरंत शिवसांगाती
चिंतियल्या दिनरात्री
तोंडवळा बघ जरा न्याहळुनि
दिसेल शिव तें नेत्रीं

**जिजाई :** कुलदेवीच्या स्पर्शें
सुखांत सरलीं वर्षें
चढो असा उत्कर्षें
हा शिवराया सह्यगिरीचा
शमला दाह उरींचा
बैरागी हां नव्हे, शुभंकर
बघतां ब्रह्मगिरीचा

## : ३६ :

# तटाला भिडली यशवंती

महाराष्ट्रांत शार्दूलांचें विक्रीडित चालतें. कोण्डाण्याच्या प्राप्तीसाठीं पोलादी बळाच्या तानाजींनी महाराष्ट्राच्या मातेचें स्वप्न साकार करण्यासाठीं दिलेलें हें जीव-दान.

जय आतां अन्तीं
तटाला भिडली यशवंती

व्यथा राजमातेची बोले
" अंगारापरि असतां डोळे
ज्वलंत, ध्वज हा कैसा डोले
तव अवती-भंवतीं "

तसाच ठेवुनि मांडव दारीं
संघर्षाची केलि तयारी
" देह हवातरि ठेवुं संगरीं "
करुनी पण चित्तीं

बुरुजावरि ज्या नजर ठरेना
लढविन तेथें माझी सेना
शिव-स्वप्नाविण भाव दिसेना
अंगारे क्रांति

कटिवरल्या या खड्गामागे
माय भवानी निरलस जागे
स्वातंत्र्याचे सांधित धागे
तोंवरि कां भ्रांति

जया महाराष्ट्राचा राणा
अतुल प्रीतिचा दे नजराणा
काय तयाला स्वत्व-रक्षणा
मरणाची भीति ?

" तान्ह्याचें मम बळ पोलादी
पिंजिल असुरांच्या अवलादी"
अक्षय होवो, मरणाआधीं
ही शिव-रसवन्ती
तटाला भिडली यशवंती

## : ३७ :

# वाकला सह्य जरि

आग्र्याच्या किल्ल्यांत अडकुन पडलेल्या शिवाजीच्या सहकाऱ्यांना डोळ्यांसमोर गनिमांच्या अमानुषतेचें विक्राळ रूप दिसूं लागलें, तेव्हां ते म्हणतात.

वज्रही चुरावें ज्या दलभाराखालीं
अक्रूर तयांतिल हें माझ्या भंवताली
काळीज जळे चरचरे येथ चिंतेंत
भवितव्य सांगते, 'आतां मृत्यु कपाळीं'

हिरिरिनें खेळलों ऐसा डाव–हु-तू-तू,
स्वातंत्र्य कुठें तें ? तो स्वप्नांतिल सेतु
लहरलें कालिया-विष ज्या यमुना-डोहीं
तटिं तिच्या दुभंगे आज जिवाचा हेतु

मायदेश–मी, अमुच्यांत उभा तो विंध्य
शिव विध्वंसाया ज्यापरि अचल अविंध
मातेसह मम जे कुशींत सह्यगिरीच्या
श्वासावर त्याचा जागवितो स्मृति-गंध

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34548 वि: काव्य
क्रमांक 1456 नों: दि: 30/1991

रघुनाथ निराजी त्र्यंबक, त्रयमूर्तीत
होतसे कल्पनेंतिल कैलास प्रतीत
इतिहास वदे, "जय अखेर सत्य शिवाचा"
मिणमिणे ज्योत परि स्नेह असुनि पणतींत

हस्तिनापूर हें तक्त पंडु - पुत्रांचें
पाहिलें शांति-सुख ज्यांनीं सर्वत्रांचें
वैभव तें कुणिहि पहावें आणि म्हणावें
"ही इंद्रपुरी, पारणें फिटें नेत्रांचें"

तेथेंच अतां आसक्ति अहंता द्वेष
जहराविण देइल काय फणीन्द्र विशेष ?
ग्रह फिरलें आलें दिवस नील-कंठाचे
जगविणें त्यांत शिव-स्वप्नांचें अवशेष

लटकलें, लटकुं दे, खड्ग शिरीं मृत्यूचें
मरणाविण सरणार न संगर 'मी-तूं'चें
वाटला, वाकला सह्य जरी दरबारीं
तरि ढळलें नव्हतें अधिष्ठान हेतूंचें

: ३८ :

# रायगडा !

रायगड-दर्शन घेतलेल्या व्यक्तीच्या हें चटकन् लक्षांत येतें कीं रायगडचा किल्ला हा सह्याद्रीच्यां कड्या न् कड्याचा रक्षक आहे. कोंकण–तल जागविणारा एक पहारेकरी आहे.

सह्याद्रीचा कडा कडा
रक्षिलास तूं रायगडा

मावळच्या खोऱ्याखोऱ्यांतिल
शार्दूलांचें उभारुनी दल
जागविलें अवघें कोंकणतल
ठेविलास अंमल करडा

पराजयाचें स्वप्न जयास न
समरव्रणांचें अंगीं भूषण
" मरेन परि ना फिरेन " करि पण
असा शिपाई करुनि खडा

स्वातंत्र्यास्तव होउनि वेडा
इथें नाचला अरबी घोडा

शौर्याचा घुमवीत पवाडा
शत्रूला चारीत खडा

तुझा पाहुनी दुरुनीही ध्वज
थरारलें गनिमांचें काळिज
समजुनि होते मदोन्मत्त गज
व्यर्थ मराठ्यांशीं झगडा

भोंवतालच्या खेड्यांमधुनी
अजून गाती किसान-रमणी
पराक्रमाची तुझिया गाणीं
कधीं शिंपिता शेण-सडा

अनाथ येथें आज उभा तूं
म्हणुनि चहुंकडे चाले मी-तूं
साधियलें परक्यांनीं हेतू
मुलुख तुझा पडतां उघडा

सह्याद्रीचा कडा कडा
राक्षिलास तूं रायगडा

: ३९ :

# सुवर्ण झालें खरें

शिव-स्पर्शाने अनेकांच्या जिवनाचें सोनें झालें. कांही कर्तबगार व्यक्तींच्या गुणांची तुला शिवबानीं अक्षरशः सोन्याने केली. त्यांतीलच सोनोपंत हे एक होत.

राज्य असावें असें, हिरण्मय होइ जिथें सत्कृति
राज-माउली आज तुझा सुत जागवि ती संस्कृति

तूं तर माता, तुज कुतुकाची कशी असावी तृषा ?
परि माझ्या मनिं ' उमलावी ही कुंकुमरंजित उषा ?

हाडपेर येथेंच वाकले, वाकवितां अरिगण
भेदित धरती जसे वाढती वट-वृक्षाचे तण

येथवरि वाहिली शिवासह मुक्तीची पालखी
शिथिल जाहल्या देहावरि या अतां न मम मालकी

मावळतीच्या दारिं मजपरी तरू किती वाकले
पितृभाव जागवून त्या तव पतिनें संरक्षिलें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५५८ वि: काव्य
क्रमांक १५१८ नों: दि: ३०।११।६

महाबळेश्वर पंचनद्यांचा तीर्थरूप शल हा
येथ तुलाविधि, शिव-स्वप्नांची कल्पकता किति पहा

देवालय, आवार आणि हें सनईनें नादलें
जिज्ञासा न्याहळी तयांचीं शिव-भक्तींचीं दलें

शौर्याचें 'सोपान' वाकलें 'निवृत्ती'च्या पदीं
जिवा-शिवाचें दर्शन दे हा जगा तुलेचा विधि

महन्मंगले ! तुला न अपुली, अपूर्व हा सोहळा
भारतीय-स्मृति प्राशिल पुढती ह्या शिव-गंगाजला

म्हणती सोनोपंत, जिवाचें सुवर्ण झालें खरें
ह्या कैलासावरी शिवानें उद्धरितां आदरें

: ४० :

## ढळले चिरे

आग्र्याहून शिवाजी पेटाऱ्यांतून पसार झाल्याची बातमी पहारेकऱ्यांना कळली तेव्हां चोहींकडे हाहाकार उडाला. त्याला साहाय्य करणाऱ्या दोन ब्राह्मणांचा वरिष्ठ अधिकारी अमानुष छळ करूं लागले. तेव्हां शिवस्वप्नांवरील त्यांची अढळ निष्ठा असेंच म्हणाली असेल.

व्यर्थ धुंडाळून हे कारागृहाचे कोपरे
कृष्ण-कारस्थान कंसाचे विरे, ढळलें चिरे

जागला जो, जागवाया गोकुळा गेला हरी
पेंगल्या जेव्हां दुधारी संगिनी निद्राभरें

भक्ष्य क्रोधाचें तुझ्या होणार आम्ही, जाणतों
द्यावया सर्वस्व भ्याले ना शिवाचे सोयरे

देह दे हा अग्निला, वा दे गिधाडांच्या करीं
सूड घे ऐसा, भरावें मृत्युलाही कांपरें

हातिंचा आसूड, भाला, खड्गही भासे उणें
ज्यागुणें वाटे तुला वार्ता हवी ती प्रस्फुरें

क्रांतिची वाणी शिवाच्या रंगली जेंव्हां मुखीं
दंडकारण्यांतलीं सारीं मिळालीं वानरें

आमुचा शिव-राम तो स्वातंत्र्य स्वप्नें जागवी
मृत्युच्या दानाविना त्या, काय द्यावें पामरें ?
मुक्तिसाठीं रक्त रक्ताला मिळालें एकदां
लौकिकाच्या लालसेला तें न होई हावरें ?

काय तुम्ही घ्याल ? देहाची घडीची मालकी
प्राण वाही पालखी त्याचीच, जो चित्तीं स्थिरे

सोडवाया शक्त आम्हां ती भवानी माउली
सावलीसाठीं जिच्या आसावलीं हीं अंतरें

: ४१ :

# नराचा होतो नारायण

रामदास आणि शिवाजी ह्या गुरु शिष्यांच्या व्यक्तित्वावर आधारलेलें हें गीत एकतारीवर गाणाऱ्या बैराग्याच्या मुखीचें लेणें आहे. कधीं कधीं असें होतें कीं दारावर येणारा भिकारी देखील आपल्यांतील चांगलें सांगून जातो त्यांतलाच हा प्रकार.

काळाच्या ऐरणीवरी घालितां पणांचे घण
नराचा होतो नारायण

"मी कोण ? केवढी कुवत माझिया करीं ?
जाणीव असावी पुरेपूर ही उरीं
तेवता असावा भक्ति-दीप अंतरीं
चिन्तानिच्या कैफांत करावें तन-मन-धन अर्पण
नराचा होतो नारायण

षड्रिपू उशाशीं जागे घ्याया बळीं
परि संयम त्यांना लोळवील पदतळीं
सौजन्य उद्धरिल कीर्तीची पातळी
अंतर्मुख आपुले पहाया हवा भाव-दर्पण
नराचा होतो नारायण

कर्मास असावी गति कालानुक्रमें
शिव-स्वप्नीं जावे गढून विरतां श्रमें
घडि आत्म-शोधना हवि चुकतां संभ्रमें
सदसद्वृत्तचिें नित चित्ती चालें संघर्षण
नराचा होतो नारायण

प्रेरणा तयाची आसमन्त अनुसरी
रक्षाहि करींची विभुतीपरि आदरी
अन् आशीर्वादा लवतो चरणावरी
आचरणीं-वाणींत तयाच्या घडते नव-दर्शन
नराचा होतो नारायण

: ४२ :

# असा येथ मारावलो

रायगडाच्या शिखरावरील एका शिलेवर बसलेल्या शिवरायाच्या मनांतील विचार.

दिवा--स्वप्न साकारितां ही घडी ये
　　रणीं झुंजतां एक पिंजे पिढी
दिगंती दडी मारली अक्रुरांनीं
　　इथें मुक्तिची फौज होतां खडी

पहाडावरी या कितीदा असा मी
　　समाधिस्त बैसून शीलेवरी
यशो--वर्धना वेंचिली भाव--शक्ति
　　दिशांच्या दलीची द्रिरेफापरी

उरीं भाव मंदावते फुंकराया
　　दिलाचे सखे सोबती लाभले
खलांचे शिरीं पेलितां घाव ज्यांचें
　　उफाळून ये शौर्य त्वेषानलें

अशा शक्तिला प्रेरणा माउलीची
गुरूंची ह्रदीं होति अव्याहत
दुभंगावया तक्त दिल्लीश्वराचें
जिच्यांतून जन्मास आलें व्रत

कृपादृष्टि ठेवून होती भवानी
जिचा कौल कर्तव्य-मूढा मना
तपें भंगल्या भूमिची, मेघमाला
उरीची जशी पूर्तवी कामना

पित्याची मनोभावना जागवाया
अहोरात्र दीपापरी तेंवलो
उषःकाल झाला, यशाच्या क्षणाला
असा एकला येथ भारावलो

पदीं वाहिलें आणखी जें जयांनीं
असें त्यांसही स्थान माझ्या ह्रदीं
जसे अंतरिक्षांत तेजाळणाऱ्या
ग्रहांना च्युतीची न भीती कधीं

: ४३ :

# इथें प्रेरणा

समर्थांच्या 'मनाच्या श्लोकांत' नीतीची शिकवण आहे. ह्या श्लोकांत यात्रिकाच्या प्रतिभेला झालेली प्रेरणा आहे.

इथें प्रेरणा सह्य दे पौरुषाला
भवानी इथें नित्य जागी उशाला
म्हणोनीं मनें येथली भाव--वेडी
सदा सज्ज तोडावया दास्य--बेडी

जळे मी जिथें क्रौर्य छेडी नतांना
वळे मूठ दंडावया उद्धतांना
फणा पिंजितो पन्नगांचा द्विजेन्द्र
तसा आमुचा हा शिवा....भालचंद्र

झटे शब्द आणावया जो कृतींत
जडे त्यावरी नेणतां विश्व-प्रीत
असा एक लाखांतुनी जेथ लाभे
तयाच्या पदीं मन्मनो-भृंग लोभे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ३५६५४ वि: काव्य
क्रमांक १५८८ नों दि ३०।११।६५

लवे सह्य-शक्ति शिवाच्या पदीं ही
उद्यांच्या यशाची निनादीत ग्वाही
कटाक्षें व्यथा जाणितो जो दुजांची
सलामी तया लाभते दिग्गजांची

विरागी अम्हीं, राम आम्हांस तारी
मनोभाव गुंफीत ये एकतारी
उरीं जागते हेतु हे श्लोक-बद्ध
उद्यां खास गातील आबाल--वृद्ध

शिवे ज्या मना कल्पना मृत्युची हो
भयें फोडितें तें अहोरात्र टाहो
तरी मान मृत्यूस मृत्कुंभ जीवा
जलाच्या सवें लोभ ज्याचा सरावा

कराया महाराष्ट्र--माता स्वतंत्र
स्फुरे शौर्य ज्याचें विरे गात्र गात्र
जयाच्या मुखीं मंत्र स्वातंत्र्य गुंजे
तयाच्या शिरीं कीर्ति-गंगा विराजे

जयाची जिजाईपरी दिव्य माता
तयाच्या न ये काय स्वातंत्र्य हाता?
कुशींतील मांगल्य त्या माउलीचे
भविष्यांत होईल लेणें जगाचें

इथें पिंजितें खड्ग गंडस्थलांना
इथें ढाल लीलेंत पेली खलांना
इथें काजळे सूर्य संग्राम--कालीं
टिळा मृत्युचा शौर्य लावी कपाळीं

जिथें कर्मयोगा नसे भक्ति-रेषा
तिथें अंतरींची न तृप्ती, नरेशा
थिटी झेप विश्वास ग्रासावयाची
नसे दैवतावीण आशा जयाची

जिथें पोंचली झेप नाहीं द्विजाची
चढाई तिथें शौर्यशाली भुजांची
विजेचें जिथें तेज खड्गांत नाचे
हवें गावया शब्द तें शाहिराचें

इथें स्पर्शिती तुंग शृंगें घनांना
विवेकें जसे संयमी सज्जनांना
प्रपातापरी शौर्य येथें प्रवाही
"अतां उन्मळूं" सूचवी "पातशाही"

मनीचें जनीं पेरितां शुद्ध बीज
अम्हांला मिळाली क्षणाची न नीज
परंतू अतां अंतरीं तृप्ति साक
बघूनी, "शिरीं हा घनश्याम वाके"

जयाची फुलें राष्ट्र–चिंतेंत वाणी
तया साथ द्याया उभा चक्रपाणी
ह्रदीं अन् पदीं भाव ज्याचा शिवाचा
ललाटीं तयाच्या टिळा वैभवाचा

मिळे राम–रक्षेंत मुक्ती अम्हांला
उषेची प्रभा जेंवि जिंकी तमाला
शिवाचा अम्हीं घोषितो स्वप्न–हेतू
तराया महाराष्ट्र–स्वातंत्र्य सेतू

शिवाभोवती हा मिळाला मराठा
धुळीला अतां उद्धतांची अहंता
असें दंडकारण्य शार्दूल–वासी
स्वभावेंच तो भेदि गंडस्थलासी

प्रजादक्ष तूं, त्याग-सेवा तुझी ही
तरंगेल गाथेपरी काळ--डोहीं
तुझ्या ठायिं आदर्श राजेपणाचा
गमे तूंच कल्गी–तुरा सद्‌गुणांचा

झडे मृत्युशी द्वंद्व येथें घडीला
खडे खड्ग स्वामित्व न्याया तडीला
इथें धूळही उत्कटे मुक्तिसाठीं
चिरंजीव व्हाया शिवाच्या ललाटीं

## : ४४ :

# पदराखालिल दिवा

शिवाजी राजा झालेला पाहून जिजाबाईला झालेला हर्ष या काव्यांतून व्यक्त झालेला आहे.

राजा झाला शिवा
माझिया पदराखालिल दिवा

पहाड अस्माना भिडणारे
शिडी करुनि त्यांवरि चढणारे
काळासम रिपुशीं लढणारे
अर्पित आले जिवा—

मत्तांची मग्रुरी चहुंकडे
घालुनी बसली होती वेढे
तयास फटकारुनि आसूड
दूरविले रौरवा—

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६६४ वि: काव्य
क्रमांक ........ नों: दि: 30/11/64

कौल देविचा येइ फळाला
यमुनेंतिल कालिया पळाला
निर्भयता ये सह्य-तळाला
वाली हरि पांडवा—

आज तुझ्या तातांचे डोळे
निवले असले बघुनि सोहळे
पुण्य तेवढें नव्हतें अपुलें
म्हणुनी विगताधवा—

उतारास लागे जीवन-पथ
आणि जाहले सार्थ मनोरथ
फिरुनि माय-भू होइल उन्नत
उजळिल गत-वैभवा—

भारतीय दरबार उद्यां तुज
आदरील पाहुनि भगवा ध्वज
अहंकारही वाकवुनी भुज
लवेल तव गौरवा—

## : ४५ :

# भक्तिचें दान ज्ञानेश्वराला

दिल्लीश्वरांनी गागाभट्टाच्या पिढ्यांची पुण्याई बरबाद केली. तेव्हां शिवाजीची कीर्ति ऐकून गागाभट्ट नाशिकला आले. शिवाजीनें त्या ज्ञानेश्वराचा गौरव पुढील शब्दांत केला.

तुझ्या पूजना आज आलों, महर्षे !
सदा संत-संगांत हृद्भाव हर्षे
कळे गौतमीच्या तटीं येउनी तूं
रहासी, इथें यावया काय हेतू ?

किती दूर तूं, काशि - विश्वेश्वराला ?
इथें त्र्यंबकीं केवि शिवेश्वराला ?
इथें भक्तिचें दान ज्ञानेश्वराला
गुढ्या-तोरणें त्याचिया अन् घराला

तुम्हांसारखे ईश येथें समर्थ
जयांच्या पदीं लीन मी स्वागतार्थ
तुझ्याही पुढें शौर्य वाके शिवाचें
नको बोलणें व्यर्थ तें गौरवाचें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६५४ वि: काव्य
क्रमांक ........ नों दि: ३०।११।६८

जगावें जिणें राष्ट्र-सेवा-व्रतानें
समाधान तेणें, न तें अमृतानें
जिथें भोगवृत्तींत भूपाल रंगे
तिथें तख्त कोरावया सिद्ध भुंगे

महाराष्ट्र हें त्रस्त केलें खलांनीं
मनें मारिलीं सांगिनींच्या बलांनीं
घडीला अशा जाग येतां जिवाला
मिळे मुक्ति ह्या अंतरींच्या शिवाला

तदा जाणिजे "ज्ञान-वैराग्य-भक्ति"
त्रयींच्यांत सामावली चित्त-शक्ति
अधिष्ठान याचें हवें राष्ट्र-धर्मा
जयाच्या गुणें भूप हो विश्वकर्मा

अतां जिंकिले स्वार्थ तीर्थांत सारे
नव्या भाव सृष्टींत आत्मा भरारे
तुझ्या पूजनीं धूळ हो रामरक्षा
किनारील शौर्यें महाराष्ट्र—कक्षा

## : ४६ :

# तख्त हवें भूपाला

'तख्तावांचून पुरुषार्थांची उंची जनतेच्या नजरेंत भरत नाहीं', ही गागाभट्टाची अनुभूति पुढील गीतांत व्यक्त केली आहे.

तुझिया 'शिव'रूपाला,
तख्त हवें भूपाला
तख्तावांचुनि केविं 'तुझेंपण' येइ नांवरूपाला

शतकांचें माहेर आमुचें देवालयमय काशी
पिढ्यापिढ्या जागल्या आमुच्या नंदादीपापाशीं
शास्त्र-कलारत निरंत आम्हीं, अमुची भक्ति तुपाशीं
परी उधळिला म्लेच्छांनीं हा पाचोळ्यासह पाला

जिथें वैश्वदेवाविण अडला माध्यान्हीचा घास
उपनिषदांच्या उद्घोषानें गंधित झाले श्वास
धर्म किनारित होता नकळत दैनंदिन कर्मास
जोत्यासह उखडिलीं दैवतें, चिरडियलें हुरुपाला

परी चरणचालींत माझिया एक नृपाळा हेतु
अभिषेकाविण तव राजेपण मानिल कुणि न परंतू
काय बांधुनी तर मग इतुका स्वातंत्र्याचा सेतु
शतकांतुनि वाचील काळ तव भाव—सूक्त—स्तूपाला

त्या रण-कल्लोळांत ऐकिली तुझ्या कीर्तिची गीतें
म्हटलें, घ्यावें तें तव दर्शन, जें हृत्ताप हरीतें
तूं पुरुषोत्तम शिरीं प्रीतिचें जनता छत्र धरीतें
नर-पूजेस्तव व्यर्थ जाळणें गंध-दीप-धूपाला

राष्ट्राच्या उध्वस्त जीवनीं सिंचिलीस चित्‌शक्ति
उभवुनि देवालयें आणिलिस उंबरठ्याबरि भक्ति
विचार-सरणींतून मनाची होइ खरी अभिव्यक्ति
विदारिले तूं विष्णु—वाहनापरी कृष्ण—सर्पाला

धन्य जिजाई जिनें पाहिलें तुला कीर्ति—कैलासीं
आणि धन्य ते अहोरात्र जे असति तुझ्या सहवासीं
धन्य व्हावया मीहि पावलों आज तुझ्या चरणाशीं
जळत राहुं दे इतरांपरि ह्या इथें ज्ञान—दीपाला
तख्त हवे भूपाला

## : ४७ :

# भाऊ म्हणुनी राहूं

व्यंकोजी हा शिवाजीचा सावत्र भाऊ. पण शिवाजीची त्याच्याशी वागणूक कशी होती, पहा ! रामाला हरघडी सहाय्य करणाऱ्या लक्ष्मणाच्या प्रवृत्तीची शिवाजीनीं त्याच्यापासून अपेक्षा केली.

भाऊ म्हणुनी राहूं
मी न पाहुणा, अपुल्याघरला
औपचार कां मग वरवरला ?
बंधुबंधुतिल स्नेह नसावा असा कधींच दिखाऊ
रक्त सजे गृह-कलहासाठीं
म्हणुनि असें दिल् यावें ओठीं
चितारल्याविण कर्म भक्तिनें पौरुष नाहिं टिकाऊ
राजदंड जरि आज करीं मम
प्रजाहितास्तव झालों निर्मम
ज्योतिर्मय मन बघतें माझें निरंजनांत विसावूं
संचरती आनंद-वनांतुनि
यात्रिक होउनि रामदास मुनि
चल ये, त्यांच्या रसवंतीनें नाहूं, पावन होऊं
जूट आपुली एक दिलाची
उधळिल सेना लाख खलांची
लक्षुमणापरि हवे सहाय्या आज मला तव बाहू
भाऊ म्हणुनि राहूं

: ४८ :

# कलल्या संध्या-छाया

राज्याभिषेक समारंभ आटोपला आहे. शिवाजीनें गुरुस्थानीं मानलेले एक एक सहकारी निवर्तले आहेत. अशा घटकेला शिवाजीला असेंच वाटलें असेल.

आसमंत काजळे गडाचा, कलल्या संध्याछाया
एक एक जीवन-सहकारी लागे गड उतराया

शिलेदार रक्ताचे अमुची स्वातंत्र्याचीं नातीं
म्हणून शतकांनीं मरगळली स्फुरली पदिंची माती
त्या मातीची चर्चुनि रक्षा शिवापरी अंगांगा
रिपु-रक्तें रंगलों प्रत्यही लाजवीत खदिरांगा
कडयाकडयांच्या करुनी ढाली होतां सह्य सहाय्या

शौर्यासंगें वरद-हस्त शिरिं होतां संत-जनांचा
सौजन्याची वीट जया पदिं, स्पर्श तया गगनाचा
पदीं तयांच्या नमतां, कळलें, "तृणवत् लौकिक देह
राजा वा ऋषि कुणा नसावा काम-क्रोध-मद-मोह"
अनुभूतींतुन जीवनांतले ये शिव साकाराया

वैभव केलें रितें हवे त्या सुगुणांच्या चरणाशीं
शेतमळे फुलवाया ज्यापरि धरणांच्या जलराशीं
राजा म्हणुनी अर्ध-तपाची घडली जी जनसेवा
परंधाम पदिं नेइन चंदन मी तो अनुपम ठेवा
सहाणेपरी तनु त्या ठायीं येइल जरि मज न्याया

हें सुख भालीं तिलकापरि जरि राज-पदाचें भाग्य
व्यथा किति उरीं याहुनि चिन्तन ज्याचें वरि वैराग्य
पौरुष उतरे पणा, तरि उभे दुर्दैवाचे हात
एकाकी मज बघुनि न्यावया, दत्त म्हणुनि दारांत
भाव-किरण नजरेंतिल बघती गगन निळे कवळाया

दा. क्र. ११८०२३

: ४९ :

# जयजयकार

राज्याभिषेक समारंभानिमित्त जमलेल्या जनतेच्या हर्षांचा हा प्रातिनिधिक आविष्कार.

**सर्व :** जयजयकार ! जयजयकार !!
छत्रपतींचा जयजयकार !!!

**सेनापती** उन्मत्तांचा उतराया मद
होते आघाडीस सदा पद
क्रांतीला वाहिली प्रत्यही रिपु--रक्ताची धार
जयजयकार !

**सैनिक :** शिव--शब्दांच्या अम्ही लगामी
सज्ज द्यावया इथें सलामी
वायु--पुत्र होउनी झेलिलें वक्षीं वज्र--प्रहार
जयजयकार !
उधळायाला मतंगजाला
उभवायाला राष्ट्र--ध्वजाला
दिलें शिवानीं स्फुरण भुजाला, शत्रु दिगंतापार
जयजयकार !

[library stamp]

**प्रधान :** प्रधानकीचीं जाणुनि वस्त्रें
चालविलीं आम्हीं शस्त्रास्त्रें
राष्ट्र-धर्म जगवितां, पाहिला राज-नीति-व्यवहार
जयजयकार !

**स्त्रिया :** आम्ही शिव-राज्यांतिल योषा
आलस्या प्रेरिलें पौरुषा
सहास्य झालो पिढ्यापिढ्यांचा सावरण्या संसार
जयजयकार !

**संत :** संत अम्ही, रत भगवत्-भजनीं
मुक्तांना कुठली दिन-रजनी ?
परंतु स्वजनीं तव स्वप्नांचा घडला साक्षात्कार
जयजयकार !

**कवि :** प्रतिभा माझी शिव-स्वप्नांकित
अशीच असुरा राहिल डंखित
झणकारिल यश तुझें आमरण, हा चरणालंकार
जयजयकार !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६६८ वि: काव्य
क्रमांक ९१५६६ नों: दि: २०/११/८५

: ५०

# उधाण आलें अंधाराला

महाराष्ट्राच्या शिरीं स्वातंत्र्याचें छत्र धरणाऱ्या शिवाजीचा मुलगा गनिमांना मिळावा, यासारखी दुसरी लांछनास्पद गोष्ट कोणती ? सूर्याचा किरण अंधाराला मिळाल्यासारखेच तें कृत्य होय.

काजळली स्वप्नांची कांति
उधाण आलें अंधाराला
पाकोळी घुबडांची सेना
बघे कुठें खिंडार घराला
चंद्र यशाचा माथ्यावरि तरि
नियतीचा हा शाप, न शंका
राजदंड अन् तख्त कशाला
असतां अपकीर्तीचा डंका ?
'पुत्र असा बलशाही, ज्यानें
उचकावा सिंहाचा जबडा
यवनांच्या थाळींत तयानें
स्नेहाविण सेवावा रबडा '
फितूर, स्वार्थी केंवि म्हणूं त्या
कळे न ज्याला अर्थ जिण्याचा

लक्ष्मीच्या सेवेंत यौवना
योग न ये सहसा शिणण्याचा
शिव-तक्ताचा सूड घ्यावया
अलम्गिराची ही चतुराई
दुर्बुद्धी मायाजालांतुनि
नित्य नवी पाही कपटाई
जाणियलें मी घडलें कां हें ?
मातृ-भाव रक्ताचे नव्हते
ग्रीष्मानें करपलें पांखरूं
जेंवि बघे राईंतिल घरटें
असतिस आई आज जरी तूं
छत्रपतींची दशा अशी ही
बघुनि बोलतिस " बघतांना हे....
डोळ्यांनो ! कां मिटला नाहीं ? "
तुझ्याचपासुनि शिकलो परि मी
" पुरुषार्थाचा लगाम संयम
निमिषाच्या अविवेकें तुटला
मनोरथा तरि विध्वंसिल यम
काजळुं दे स्वप्नांची कांति
तम अवसेचा ग्रासूं दे नभ
मातृ-भक्त शिव रायगडाचा
होइल ताऱ्यापरि न हत-प्रभ

: ५१ :

# असावें एक छत्र भारतीं

आकांक्षाच्या पूर्तीसाठीं अस्मान लवविणें हाच थोरांचा पुरुषार्थ. महाराष्ट्राचें छत्रपति-पद मिळून देखिल शिवाजीमहाराज अतृप्त होते. त्यांना वाटे 'भारतावर एक-छत्रीं राज्य असावें.'

राज-मुकुट शिरिं चढे, चालली जरि ही पूजारती
अमूर्त अजुनी आस, 'असावें एक छत्र भारतीं'
शिवनेरीवरि शशवीच विजिगीषा अंगारली
परवशतेनें मरळलेलीं मनें फिरुनि भारली
मातृ-मुखांतुनि गंगोत्रीपरि झरलें रामायण
जाणिवेंतुनी मोहरला त्या स्वातंत्र्याचा पण
सह्य-गिरीची दरीदरी धुंडिकी सौंगड्यासवें
जाणुनि घ्याया पिढ्या-पिढ्यांच्या व्यथेंतील आसवें
हां हां म्हणतां उखडाया जूं मावळ-बल पेटलें
गरुडांनीं पिंजिले नाग जे दृष्टिपथा भेटले
ललकारित क्रांतिच्या जागलें महाराष्ट्र-भूतल
करांगुलीवरि पेलित हरिपरि सम्राटांचें बल
अटीतटीच्या रणीं द्यावया आत्म्याची आहुति
एकामागुनि एक मिळाले हवे तसे सारथी

शौर्य असें उधळितां रिपूंचा क्रोधहि भिडला नभा
अष्टाग्रह ग्रासिती ज्यापरी मार्तंडाची प्रभा
कालकूट क्रौर्याचें ज्यांच्या मती-कृतींतुनि झरे
दशाननापरि दहशतवादी धाडियले मोहरे
एकेकाची परी अहंता ढळली उल्केपरी
चिरंजीव तो शुभंकराचें दैवत ज्याच्या उरीं
पुनवेचें यश असें वाढतां, चढतां माथ्यावरीं
सुखासीनता दिसुनी आली मावळल्या परिसरीं
भीति पावलांतून पळाली, धैर्य चढें लोचनीं
कोण न होई पुढें लाभतां गुणा प्रेरिता धनी ?
प्रहर घडीला रंगत जातां मनोरथाची गति
मनांत ये आसेतु-हिमाचल कवेंत यावी क्षिति

भाव धरुनि तो उरीं, उधळिलें दिगंतराळीं दल
'ध्वज भगवा जगवा', उद्‌घोषें रिपु झालें हतबल
निनादल्या नौबदी कीर्तिच्या काशी-विश्वेश्वरीं
पंडित, गागाभट्ट नाम, ये भेटाया इथवरी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५५५४ वि: काव्य
क्रमांक ... २५५९८ ... नों: दि: ३०/११/६

सौजन्यांकित आज्ञापूर्वक वदला ज्ञानेश्वर
‘राज्यपदाविण तुझी नरवरा कीर्ती ही नश्वर
पिढ्यापिढ्यांची जिथें संस्कृती चढली सरणावरी
ती मरणाची दरी लंघुनी आलों मी इथवरी
छत्रपति तूं खरा, तरि हवा राजदंड तव करीं
अखंड-भारत राज-महर्षी म्हणुनि तुला आदरी
आज माझियापुढें उभा तो गुणज्ञ विद्यापती
चिंतित, ‘हा शिव-चंद्र प्रकाशो असा महाभारतीं’

राज-मुकुट शिरिं चढे, चालली जरि ही पूजारती
अमूर्त अजुनी आस, ‘ असावें एक छत्र भारतीं ’

: ५२ :

# आई

राज्याभिषेक समारंभानंतर उण्यापुऱ्या पंधरवड्यांतच जिजाबाई निवर्तली. त्या प्रसंगीं शिवरायाच्या मनांतील हे करुणोद्गार.

आई............!
माहित असुनी तुला जवळचें मला कुणीही नाहीं
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई ?

शिवनेरीचा शीतल मंगल परिसर वनराईचा
त्यांत निरंतर भाव सुकोमल स्पर्श तुझा साईचा
राउळांतल्या घुमल्या घटका घंटा-टाळ मृदंगें
भक्तिभावही माझा रंगे, त्यांच्या ओवि–अभंगें
संगोपाया माझ्यांतिल तूं राम-पदाचा अंश
कुशींत घेउनि अंकावरती ऐकविला रघुवंश
तुझ्या केशरी कंठांतिल ती अजुनि स्मरे अंगाई
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई ?

आणि सिंहिणीपरी ठेउनी दृष्टिपथीं छाव्याला
डावपेंच पढविले हवे ते तूं गनिमी–काव्याला
अध्ययनीं केलीस योजना तूं ऋषितुल्य गुरूंची
यात्रिकास लाभली स्वप्निंची छाया कल्प–तरूची
राजनीति व्यवहार जाणतां होतां, तूं वदलीस
" नक्षत्राचें फूल आगळे येइ वंश–वेलीस "
फूल तुझें तें कंठित दुर्दिन केंवि तुझ्याविण राही
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई ?

वय सोळावें प्रस्फुरलें "चल पौरुष आतां तोल....
तळहातावरि पेलुनि बघ हा महाराष्ट्र–भूगोल "
सहज बांधितां हुकारे तव 'तोरण दिग्विजयाचें'
बोललीस तूं "पर्व सुरूं हो मत्तांच्या प्रलयाचें "
एकामागुनि एक जिंकिता अवघड गड यवनांचे
दिगंतातुनी ये तव कानीं चरण शिव–स्तवनाचें
बोल मिठीसह आलें कवळित "पाहिन कां शिवशाही?"
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई ?

कलश यशाचा घेउनि चढतां तुजसह सिंहासनीं
उठे गर्जना, "चिरंजीव शिवराणा अमुचा धनी"
"पुत्र शिवापरि गंगा धरि शिरिं" गौरविलें कोण तुला
"तुझ्या सुखाला उणी पडावी सौवर्णाची तुला"
झळाळली पाहिली तुझ्या मुखिं शिवनेरीची प्रभा
स्वप्नें नव फुलवीत न्याहळित होतिस जेव्हां नभा
ही चिर-तारुण्याची किमया असतां तुझिया ठायीं
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई ?

आजवरी होतीस जवळ जशि, अजुनि हवी होतीस
धीर द्यावया अच्युत व्हाया माझ्या राजमतीस
छत्रपती असुनीहि पोरका आज तुझा शिवराया
मातृकरीचें छत्र निरंजन अतां न तप वाराया
जितेपणीं परि ये न भालिचें वाचाया प्रारब्ध
काय उधळुनी तर मग मागे शब्दावरती शब्द
भिरभिरतिल बेचैन होउनी माझे भाव विदेही
संध्येच्या घरिं परतायाची कशास इतुकी घाई

: ५३ :

# श्वाना ! शिवाकार तूं

शिवाजीमहाराजांच्या चितेंत त्यांच्या कुत्र्यानें उडी घेतली ! चिंता चितेला वहाणाऱ्या शिवाच्या रक्षेंत विलीन होण्यांत श्वान जर जिवाची सार्थकता झाली असें मानतो, तर तुम्हां–आम्हांला तसें कां वाटूं नये ? रायगडावरील शिव-समाधीपुढील श्वानास पाहून हा विचार सुचलेला आहे.

ज्याचें शैशव जागलें कवाळितां सह्याचलाचे कडे
जिज्ञासा स्फुरली तशी परिसुनी रामायणाचे धडे
ज्याचें पौरुष षोडशीच चढले ग्रासावया केतुला
भालीं वागवि कीर्ति-चंद्र शिव तो, त्याच्या यशा ना तुला
श्वाना ! स्थान - विशेष अक्षय तुला त्याच्या समाधीपुढें
पायीं पाहियलें विशाल जग हें, ऐसें न कोठें घडें
डोळ्यांनीं बघतां चितेवरि धनी त्वत्भक्ति हेलावली
श्रद्धेयांचुनि भारभूत जगणें होतें खरे, भूतलीं
मी रक्षांकित यात्रिकापरि भ्रमे शोधीत विश्वीं शिव
सेवाधर्म जिथें, तिथें प्राचितिला येते मनो-वैभव
आहे जात तुझी अ-मानुष तरी येथें मिळे बोध हा
"स्वामींच्या पदिं भावरूप उरतां चिंता चितेला वहा"
आतां कोण पशू गणील तुजला श्वाना शिवाकार तूं
आकल्पांत इमान गातिल तुझे संवत्सराचे ऋतं

## : ५४ :

# भजन अतां काळाचें

काळ शतकाशतकांतून एखाद्याचेंच भजन गातो. प्रलयंकराचें विष पचविणाऱ्या शिवाजीचें शव—नव्हे शिव—खांद्यावरून नेतांना काळानीं हेंच भजन गायिलें असेल.

भजन अतां काळाचें

अर्ध-शतक या देहीं श्रमलें
उशागतीला गुरु-जन जमलें
श्रद्धान्वित मन चरणीं नमलें
सह्य-तळाला फिरुनि कोठलें दर्शन क्षितिपालाचें

राजा केवळ नव्हे, महर्षि
नगापरी अविचल संघर्षीं
दृष्टि तयाची भावस्पर्शी
प्रलयंकर होऊन पचविलें जहर जगड्व्याळाचें

शरण ह्यास मी, हा मृत्युंजय
स्थितप्रज्ञ ब्रह्मानंदी लय
मुखीं मुक्तिचा उमले आशय
भारतवर्षीं कार्य अलौकिक या नर शार्दूलाचें

लय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम 35548 वि: काव्य
क्रमांक १५९८ नों: दि: 30/11/

तरिहि उचलणें चुके न याला
चुकेन नातरि कर्तव्याला
स्पर्श शवाला नव्हे, शिवाला
स्कंधीं वाहुनि नेणें, माझ्या भूषण बाहु - बलाचें

युग-पुरुषांचें स्वीकारुनि ऋण
धरतीचें मी करितो नंदन
निरंत अमुचें भाव - निबंधन
भगवा ध्वज हा गाइल पौरुष याच्या कुल - शीलाचें
भजन अतां काळाचें

: ५५ :

# भेटे सह्य हिमाला

आज जवळ जवळ तीनशें वर्षांनीं महाराष्ट्र हा दिल्लीचा मुजरा मानानें स्वीकारत आहे. हिमालयाच्या संरक्षणासाठीं सह्याद्रीला मारलेली ही हांक, हें काळानें फुलविलेलें एक शिव-स्वप्नच नव्हे काय ?

भेटे सह्य हिमाळा
कटिवरि ज्याच्या खेळे गंगा
शिरिं ज्याच्या घनमाला

-१-

कैलासावर
पेटे संगर
गौरीशंकर
हो प्रलयंकर
तेज हरील तमाला

-२-

गर्जत 'हरहर'
मर्द मराठा
हिमालयाच्या
अडविल वाटा
पिंजित पथिं गनिमाला

-३-

उल्लंघिल जो
भारत - कक्षा
अम्हीं तयाचा
उतरूं नक्षा
राक्षिल ' शिव ' आम्हांला

-४-

शिव-तेजाच्या
जटेंतून ह्या
अंगाराच्या
फुटातिल लाह्या
उधळाया अधमाला

-५-

खड्गावरि ही
पकड मुठीची
व्यर्थ वलगना
अतां लुटीची
भ्यालों कधिं न यमाला

-६-

सत्त्व तमाचा
हा संघर्ष
विजयी अंतीं
भारतवर्ष
सत्य वरी रामाला
भेटे सह्य हिमाला

११६
दा. क्र. ११७५३

# प्रफुल्ल-दत्त यांचें साहित्य

१ मृणाल-पत्रें ( कादंबरी )

२ अशोकाचीं फुलें ( गद्य-काव्य )

३ तपोवनांतील दुर्वा
( एका पालकाची दैनंदिनी )

४ डोळ्यांचीं निरांजनें
( गुरु-शिष्य संबंधावर आधारलेलीं पत्रें )

५ लाटा-लहरी ( रुबाया )

६ चिन्तनिकेचीं पानें ( रुबाया )

७ पाळण्याची दोरी ( नाटिका )

८ गोमंतक ( ,, )

९ दया तिचें नांव ( ,, )

१० भावलेणीं ( ललित-निबंध )

११ अनंताच्या आराधनेंत आणि यज्ञ

१२ शिव-स्वप्न ( काव्य )

१३ कैरविणी ( काव्य )

## आगामी

१४ रेशमी लड्या ( गद्य-काव्य )

१५ पदन्यास ( संगीतिका )

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम ३५६८४ वि: काव्य
क्रमांक १५५८ नों: दि: ३०/११/
REFBK-0011773
REFBK-0011773